₹ १०/-

संत निरंकारी मराठी

पाने ४४ • वर्ष २० वे • अंक ७ वा • जुलै २०१४



भारताच्या विदेश मंत्री माननीय श्रीमती सुषमा स्वराज यांची सदिच्छा भेट घेताना संत निरंकारी मंडळाचे प्रबंधक

सद्गुरु बाबाजींच्या सान्निध्यामध्ये मसूरी (उत्तराखंड) येथील आयोजित सत्संग समारोहामध्ये आपले भाव व्यक्त करताना स्थानिक भगिनी, सोबत मातृशक्ती

टिळक नगर दिल्ली येथे संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनद्वारा निरंकारी वोकेशनल सेंटरचे उद्घाटन करताना भगिनी बिंदिया छाब्राजी, सोबत आहेत प्रबंधक

संत निरंकारी

देश व विश्वात्या अकरा भाषेत प्रकाशित

(संत निरंकारी मंडळाचे ध्येय व कार्य आणि संत महापुरुषांची शिकवण देणारे भक्तिमार्गदर्शनपर मराठी नियतकालिक)

वर्ष २०वे | अंक ७ वा | जुलै २०१४ | पाने ४४

❖ संपादक - श्री. चंद्रकांत अनंत जाधव ❖ सहसंपादक - श्री. जगन्नाथ चैतन्य मडकर ❖ सहाय्यक - श्री. अमित अनिल चव्हाण

अनुक्रमणिका

कायमस्वरुपी

संपादकीय	.....	चंद्रकांत अ. जाधव	४
श्रीगुरुवचनामृत	.....	सद्गुरु बाबाजी	५

लेख

आध्यात्मिक जागृती आणि आधुनिकता		श्री. मानसिंह शि. कदम	१२
गुरुभक्ताचा व्यवहार पवित्र व स्पष्ट असावा.....		श्री. जे.आर.डी. 'सत्यार्थी'	१३
विवेक विचारधारेचा अनमोल खजिना		विवेक शौक	१५
अनुभवाचे बोल - अशी भेटली गुरुमाई		श्री. अनिल माने	१७
संयमाने क्रोधावर विजय.....	.....	--	१८
लहानपण देगा देवा.....	.....	श्री. मंगेश म. खरे	१९
पुरे का हर काम पुरा....	.....	श्री. नितेश म. पंडित	२१
अंतरंगातून उठलेला अहोभाव	.....	श्री. महेश सक्सेना	२४
समदृष्टीतून सुंदर सृष्टीचे दर्शन	.....	श्री.'बापू' श्रीकृष्णदास निरंकारी	२५
प्रेमरुप भक्ती.....	.....	श्री. नितिन ल. घुरुप	२७
एक देव आहे खरा....	.....	श्री. सिताराम कोळेकर	२९
नामाची आवडी तोचि जाणा देव !....	.....	श्री. वसंत का. दळवी	३१
प्रत्येक सेवा महान आहे.....	.....	श्री. जयश्री कृ. जाधव	३३
संत समागम: प्रभाविकतेसाठी की.....	.....	श्री. मनोज ग. कदम	३५
जीवनात दु:ख का आहे ?.....	.....	श्री. शब्बीर इ. नदाफ	३९
आरोग्यविषयी महत्वाचे	.....	दिलराज सिंह	४०
म्हणे अवतार	.....	स. वि. लव्हटे	४१

गीत/कविता

दिव्य गुणांना धारण करुनी.....	.....	सौ. संगीता चव्हाण	१४
सदगुरु महिमा.....	.....	श्री. भिकाजी लाड	१८
आम्ही भाग्यवंत.....	.....	श्री. कालीदास परब	२०

अंतर्गत सजावट : संजय तुकाराम जालगांवकर व आतिश चंद्रकांत शिंदे





लेखकाच्या विचारांशी संपादक सहमत असणे अनिवार्य नाही.

वर्गणी	वार्षिक	आजीवन
भारत	₹ १००/-	₹ १०००/-
इंग्लंड	£ 12	£ 150
युरोप	€ 15	€ 200
अमेरिका	$ 20	$ 250
कॅनडा	$ 25	$ 300

प्रति अंक रु. १०/-

कार्यालय/पत्रव्यवहार पत्ता
पत्रिका विभाग,
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, मुं - १४.
फोन : २४१० ५७ ४९
इंटरनेट: http://www.nirankari.org
ई-मेल: marathi@nirankari.org

मालक : संत निरंकारी मंडळ
संत निरंकारी सत्संग भवन,
माहूल रोड, चेंबूर, मुंबई - ४०० ०७४.
दूरध्वनी : २५५३ १४ ६८

Member of All India Small and Medium Newspapers Association and Indian Languages Newspapers Association

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक आणि प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी हे मासिक एम.पी. प्रिंटर्स, बी-२२०, फेस-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश), येथे छापून संत निरंकारी सत्संग भवन, ५०, मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४ येथे प्रकाशित केले.

संपादक - श्री. चंद्रकांत अनंत जाधव

प्रकाशन पत्रिका अभियान, मागे सर्वांचे योगदान

निरंकारी मिशनचं साहित्य हे भक्तिमार्गावर चालण्यासाठी सदैव प्रेरित करत असून जीवनात गुरुमत सुदृढ करण्यातही महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. काळाची गरज म्हणून व्यवस्थेत योगदान देणाऱ्या प्रत्येक महापुरुषाने निरंकारी मिशनच्या प्रकाशित साहित्याचं आणि पत्र-पत्रिकेचं वाचन करण्यात आवड निर्माण करणे व इतरांनाही ती प्रेरणा देण्याचं आवाहन नुकतंच दिल्ली मुख्यालयाच्या प्रकाशन विभागातर्फे करण्यात आलं.

जीवनात अंतर्बाह्य परिवर्तन करण्याचं विलक्षण सामर्थ्य या प्रकाशन साहित्यात असून पत्र-पत्रिकेच्या माध्यमातून सद्गुरुचा दैवी संदेश प्रत्येकापर्यंत पोहचणं किती गरजेचं आहे हे अशा मार्गदर्शन शिबिरांतून पटवून देण्याचा प्रयत्न होत आहे. कारण प्रकाशन व पत्र-पत्रिका प्रचार-प्रसार अभियान संपूर्ण देशभर राबविण्याचा आदेश स्वयं सद्गुरु बाबाजींचा असून प्रत्येक संत-महात्म्यांच्या घरी पत्रिका व प्रकाशन साहित्य पोचणं अनिवार्य असून त्यांचं आवडीनं वाचनही होणं तितकंच गरजेचं आहे. कारण वाचनाने घडतो माणूस असं बाबाजींचंही स्पष्ट मत आहे आणि ही जबाबदारी फक्त झोनलप्रमुख, संयोजक, क्षेत्रीय संचालक, मुखी, संचालक, सेवादल अधिकारी, प्रचारक यांचीच नसून 'एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ' या संतवचनाप्रमाणे प्रत्येक महापुरुषांची आहे.

बाबाजी म्हणतात, पत्र-पत्रिका मिशनच्या प्रचार-प्रसाराचं मुख्य साधन असून प्रत्येकजण मिशनच्या प्रचार-प्रसारात योगदान देऊ शकतो. कारण ज्या ठिकाणी प्रचारक पोहचू शकत नाही अशा ठिकाणी तसेच दुर्गम स्थळी संत निरंकारी मासिक, हसती दुनिया व एक नजर पत्रिका मिशनचा संदेश पोचवण्याचं कार्य करतात. मिशनचा परिचय व सिध्दांत जनसामान्यांपर्यंत पोचवण्यातही मिशनच्या साहित्याचं अमूल्य योगदान आहे.

मंडळाच्या व्यवस्थापन समितीला ही गोष्ट 'प्रचार-प्रबंध व्यवस्था' (ब्ल्यू बुक) या अतिशय मेहनत घेऊन तयार केलेल्या पुस्तकात बाबाजींनी अतिशय स्पष्टपणे समजवून दिली आहे. असे असूनही अपेक्षित परिणाम दिसून आलेला नाही. महापुरुषांच्या परिवारांची संख्या पाहता पत्र-पत्रिका व प्रकाशन अद्याप ८५ टक्के परिवारात पोचलेले नाही आणि म्हणूनच सद्गुरु बाबाजींनी ऑक्टोबर २०१३ पासून प्रकाशन-पत्र पत्रिका प्रचार-प्रसार अभियानाची जबाबदारी सेवादलच्या मजबूत खांद्यावर मोठ्या विश्वासाने दिली आहे. त्या अनुषंगाने सेवादल महात्मा घरोघर गणना (सर्व्हे) करत असून पत्र- पत्रिकेचे सभासद बनवत आहेत. तेव्हा तमाम साऱ्या संत-महापुरुषांच्या पावन पवित्र चरणी करबध्द प्रार्थना आहे की, पत्र-पत्रिका आणि प्रकाशन साहित्याच्या माध्यमातून मिशनच्या प्रचार-प्रसाराच्या कार्यात प्रत्येकाने सहकार्य करुन सेवेचा वाटा उचलावा व सद्गुरुच्या कृपाशीर्वादाचे भागीदार व्हावे.

चंद्रकांत जाधव
snm.jadhavca@gmail.com

श्री गुरुवचनामृत



(बुधवार, दिनांक २८ मे, २०१४ रोजी उत्तराखंडची राजधानी डेहराडून येथे आयोजित सत्संग समारोहात उपस्थित भाविक भक्तगणांना संबोधित करताना सद्‌गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी वेग्लेल्या प्रवचनाचा मराठी अनुवाद)

संतजनहो, प्रेमाने बोला
धन निरंकार जी!

संतजनहो! आज इथे डेहराडूनमध्ये या विशाल रुपात आपणां सर्वांच्या दर्शनाने फारच आनंद होत आहे. जवळपास एक महिन्यापूर्वी २८ एप्रिल रोजी उत्तर प्रदेशातील सहारनपुरमध्ये अशाच विशाल रुपात सत्संग करण्याचा योग आला आणि बरोबर एक महिन्यानंतर आज इथे डेहराडूनमध्ये या सत्संगाच्या रुपात आपणां सर्वांचे दर्शन होत आहे. अशाचप्रकारे जागो जागी

जाण्याचे योग येत आहेत. नववर्षाच्या आगमनापासूनच उत्तर प्रदेशातील आगऱ्यामध्ये ५ जानेवारीला सत्संग करण्याची संधी मिळाली आणि त्यानंतर हरियाणातील पलवलमध्ये. त्यानंतर प्रारंभ झाला मध्य प्रदेशच्या दौऱ्याला, ग्वाल्हेरहून निघाल्यानंतर मार्गात अनेक ठिकाणी भेट देत मुंबईला महाराष्ट्राच्या तीन दिवसीय संत समागमाला जाणे झाले. तिथूनच पुढे महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर आणि गोव्यातील पणजीमध्ये सत्संग करण्याचा योग आला. तिथून कर्नाटकातील बेंगळुरु, हुबळी, आंध्र प्रदेशातील हैद्राबाद आणि परत नागपूरसह महाराष्ट्रातील काही ठिकाणे त्यानंतर पुन्हा मध्य प्रदेशातील सागर. त्याचप्रमाणे दिल्लीला परतल्यानंतर आणखीही अनेक ठिकाणी जाण्याचे योग आले.

हरियाणा आणि राजस्थानचे प्रादेशिक संत समागम अनुक्रमे रेवाडी आणि चित्तोडगढ येथे झाले. त्याचबरोबर राजस्थानातील भीलवाडा येथे जाण्याची संधी मिळाली आणि पुनश्च मुंबईला जाण्याचा योग आला. गुजरातच्या कच्छ भागासह अन्य शहरांतही जाण्याचा मोका मिळाला आणि १८ एप्रिलपासून उत्तर प्रदेशातील वाराणसी, अलाहाबाद, कानपूर, बांदा इत्यादि ठिकाणी सत्संग करण्याचा योग आला. मग दिल्लीला परतल्यानंतर जसे दासने सांगितले की, सहारनपुर दिल्ली व आजूबाजूच्या खुर्जा येथे किंवा मग बागपतमध्ये आणि हरियाणातील पटौदीमध्ये अशा तऱ्हेचे अवसर प्राप्त होत राहिले जिथे एकत्रित येऊन एका बाजूला या निराकार प्रभुचे गुणगान होत असतानाच मानवतेचा संदेश दिला गेला. आजदेखील इथे आदरणीय मुख्यमंत्र्यांनी याच कमकुवत होत चाललेल्या मानवेतचा आणि माणुसकीचा उल्लेख केला. जगामध्ये मानव खूप आहेत पण मानवतेची ओळख नष्ट होत चालली आहे. त्यामुळेच आपल्याला मानवतेचे आचरण कुठे दिसत नाही, चहुकडे दानवतेचेच दर्शन घडत आहे.

मानवता व माणुसकीला दृढ करण्यासाठीच संत-महापुरुष प्रयासरत आहेत आणि अवघ्या जगाला याचीच नितांत गरज आहे. कारण जर ही मानवताच कमकुवत होत गेली, जर करुणेची भावना, प्रेमाची भावना, सहनशीलतेची भावना, एकमेकाला सहाय्य करण्याची भावना कमी होत गेली तर मग स्वार्थ, लालसा शोषण हेच प्रबळ होत जातील आणि तेच आपल्याला पहायला मिळत आहे. आपण सर्वजण एकत्रित येऊन आज हाच मानवता-माणुसकीचा संदेश देत आहात. महापुरुषांनी मानवतेलाच खऱ्या धर्माच्या रुपात स्थापन केले होते. मग सत्ययुगाविषयी बोला, त्रेताविषयी बोला, द्वापारविषयी बोला किंवा कलियुगाविषयी बोला. प्रत्येक युगात जे जे गुरु-पीर-पैगंबर या जगात आले त्या सर्वांनी या मानवता धर्माचीच स्थापना केली होती आणि त्यालाच महत्व देण्याचे संदेश लोकांना दिले होते. मनुष्य हा शारिरिक प्रवास तर करीत असतो परंतु अज्ञानात असतो, अंधारात असतो. धर्माचे खरे रुप काय आहे, जीवनाचे महत्व कशामुळे आहे, आत्म्याचे कल्याण कशाप्रकारे होते, हे जीवन शोभायमान कसे बनते, जीवनात आनंद कसा येतो, हे जाणत नाही. या सर्व गोष्टींविषयी अनभिज्ञ असुनही मनुष्य या बाजुला डोळेझाक करतो आणि हे अनमोल श्वास त्याच्या हातातून निघून जातात. मुठीतून सरकणाऱ्या वाळुप्रमाणे एक एक पळ, एक एक क्षण, एक एक घडी, एक एक श्वास हातातून निघून चालला आहे.

महापुरुष सांगतात की, हे जाणारे क्षण परत येणार नाहीत. तू यांना थांबवण्याचा प्रयत्न करुनही ते थांबणार नाहीत. श्रीमंत असो, राजा असो, सम्राट असो, विद्वान असो, रुपवान असो, कोणीही असो एक पळ सुध्दा थांबविण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये नाही. जे श्वास निघून गेले ते परत येणार नाहीत; म्हणूनच हे मानवा! तू या श्वासांची कदर कर, या क्षणांची कदर कर, ह्या पळांचा श्रृंगार कर, यांना सजव-सावर. याचाच अर्थ आपल्या जीवनाचा श्रृंगार कर, आपले आचरण सुधार. करुणा, दया आदि गुणांनी युक्त होऊन तू आपला जीवनप्रवास कर. याच्यातच तुझे शहाणपण आहे. अन्यथा वेडेपणाच चालला आहे, मूर्खतेची प्रमाणे दिली जात आहेत. अनमोल समय लाभला आहे. अनमोल श्वास लाभले आहेत, अनमोल जीवन लाभले आहे; पण तू त्याची काय इतिश्री केली आहेस ?

तू हे जीवन जगत आहेस तसेच पशू-पक्षी सुध्दा जगत नाहीत का? त्यांचे प्राण नाहीत का? ते जीवनप्रवास करीत नाहीत का? शरीर त्यांच्याकडेही आहे. अशाच

प्रकारे तूही समय व्यतीत करीत आहेस. परंतु याच अज्ञानतेमुळे, याच नादानपणामुळे माणूस आणि पशू यांच्यामध्ये जी एक रेषा होती, जिच्यामुळे तुझी वेगळी ओळख बनणार होती ती रेषाच लुप्त झाली. तुझे शरीर वेगळे आहे. तुला चार पाय नाहीत आणि तुझ्या डोक्यावर शिंगेही नाहीत किंवा मागे शेपूटही नाही. त्या रुपात तुझी वेगळी ओळख आहे; परंतु तुझे आचरण व कर्म यांच्या दरम्यान जी रेषा होती, ज्यामुळे तुला पशुपक्ष्यांपेक्षा वेगळे करुन दाखवायचे होते ती धुळीला मिळाली, लुप्त झाली आणि तुझी वागणूक जनावरांसारखी बनली. इतकेच नव्हे तर तू त्यांच्यापेक्षाही हीन झालास. त्यांच्यापेक्षाही अध:पतीत झालास.

दास नेहमी सांगतो की, जेव्हा मनुष्य मानवी आचरण सोडून देतो, माणसासारखा वागत नाही, तेव्हा तो पशुतुल्य नव्हे तर पशुहून हीन बनतो. कारण जनावरांना ती विचार करण्याची किंवा समजून घेण्याची शक्ती दिली गेलेली नाही, जी माणसाला दिलेली आहे. तो विवेक हरवून बसल्याने आणि त्या सुज्ञपणाचा वापर न केल्याने तू पशुसमान नव्हे तर थेट पशुपेक्षा हीन दर्जाला प्राप्त होशील. पशुंकडे तर ते सामर्थ्य नाही, ती समज नाही. तसे पाहिले तर प्रभुने त्यांनाही गुण प्रदान केलेले आहेत किंबहुना कितीतरी अधिक गुण दिलेले आहेत, तरीही तुझा दर्जा श्रेष्ठ मानला गेला आहे. तेव्हा मानवांनो! तुम्ही या समयाचे मोल करा, तुम्ही ही जागृती प्राप्त करुन घ्या, तुम्ही या सजगतेने युक्त व्हा. तुम्ही या सत्याशी नाते जोडा, या सत्याचा अंगिकार करा आणि आपल्या मनातील भावनांना सुंदर रुप देऊन आपल्या जीवनाला ती सुंदरता प्रदान करा. कारण मनाला सुंदरता मिळाली म्हणजे जीवनाला सुंदरता येईल. मनातील भावनांना सुंदरता मिळाली म्हणजे तुमचे आचरण करुणापूर्ण होईल, तुमचा व्यवहार दयापूर्ण होईल.

आताच जसे दासने सांगितले की, गुजरात राज्याच्या कित्येक शहरांमध्ये जाण्याचा योग आला; मग ते बडोदा असो, अंकलेश्वर असो, नडियाड असो, भावनगर असो, राजकोट असो, गांधीधाम असो किंवा मग गांधीनगर असो. तेव्हा तिथेही भक्त होऊन गेले आहेत, ज्यांची भजने बहुदा गायली जात आहेत. महात्मा गांधींजींनाही ते भजन फार आवडत असे की -

वैष्णव जन तो तेणे कहिये, जे पीर पराई जाणे रे।
पर दुख उपकार करे तोये, मन अभिमान न आणे रे।

अशाचप्रकारे नरसी भक्त असोत किंवा महाराष्ट्रातील संत तुकाराम, संत नामदेव असोत किंवा आजदेखील ज्यांच्या

गेलेला क्षण परत येणार नाही. तू यांना थांबविण्याचा प्रयत्न केलास तरी ते थांबणार नाहीत. तू धनवान असलास, सम्राट असलास, विद्वान असलास, तू रुपवान असलास तू काहीही असलास तरी तू यांना एक क्षणभरही थांबविण्यास असमर्थ आहेस. म्हणून तू या श्वासांची कदर कर यांना सुंदर सजव यातच तुझी समजदारी आहे. नाहीतर सर्व अज्ञानही अज्ञान आहे. सर्वत्र मुर्खपणाचेच प्रमाण मिळत आहे.



वाणीचा उपयोग केला गेला ते कबीरजी असोत; भक्तांचे संतांचे कोणतेही रुप असो ते सुध्दा हेच सांगत आहेत की,

परहित लाख तजे जो देय संती संग प्रसन्सीह ते ही।

तेव्हा करुणा आणि दयेच्या भावनेने युक्त होऊन जगण्याचा विषय चालला होता. खरं तर हीच मानवतेची ओळख आहे. आपल्याला याच गुणांनी युक्त होऊन आपले जीवन श्रृंगारायचे आहे, जीवन शोभायमान बनवायचे आहे. आजवर आलीशान घरांमुळे कोणी शोभायमान बनलेला नाही, मग ते सोन्याचे महाल का असेनात! रावणाजवळ केवळ महालच नव्हे तर संपूर्ण लंकाच सोन्याची असल्याचे मानले गेले आहे की, रावणाजवळ सोन्याची लंका होती. तेव्हा सोन्यामुळे, सम्राट असल्यामुळे किंवा राजा असल्यामुळे अथवा मायावी शक्ती असल्यामुळे रावणाला तो दर्जा प्राप्त झाला का? त्याला ती शोभा लाभली का? नाही. उलट आजवर त्याचे पुतळे जाळले जात आहेत. याचाच अर्थ तुम्ही राजा असणे, धनवान असणे, तुमच्याजवळ महाल-माड्या असणे आणि खूप कलागुण असणे इत्यादिंमुळे जीवन श्रृंगारत नाही, जीवनाला शोभा येत नाही. ती शोभा येते जेव्हा तुम्ही या सत्याशी नाते जोडता, याला आधार बनवता, याच्या रंगात रंगून जाता, संतांची मती धारण करता, भक्तप्रवृत्तिचा अंगिकार करता, सर्वांशी सद्व्यवहार करुन सुंदर जीवन जगता तेव्हाच तुम्ही शोभायमान बनता. तेव्हाच तुमचे यशोगान होते, तेव्हाच तुमचे स्थान उंचावते. म्हणूनच संत-महात्म्यांनी, गुरु-पीर-पैगंबरांनी मानवमात्राला हीच प्रेरणा दिलेली आहे. परंतु मानवमात्राकडे पाहिले, त्यांचे आचरण बघितले म्हणजे विचार फिरुन तिथेच येतो आणि केवढी तरी निराशा पदरी पडते. ते आपल्या जीवनाचे कसे वाटोळे करीत आहेत, या जगाची काय अवस्था बनवत आहेत; आपला दर्जा खालावत आहेत, जगाचे वातावरण दु:खद बनवत आहेत, तणावपूर्ण बनवत आहेत, पीडादायक बनवत आहेत, भयावह बनवत आहेत. अशाप्रकारे माणसं वागू लागली आहेत.

सांगण्याचे तात्पर्य इतकेच आहे की, महापुरुषांनी, संतांनी प्रत्येक मानवाला ही प्रेरणा दिलेली आहे, म्हणूनच संतांचा संदेश Universal (सार्वभौमिक) राहिलेला आहे. विशिष्ट भाषा बोलणाऱ्यांसाठी किंवा विशिष्ट ठिकाणी राहणाऱ्यांपुरता नाही. जर प्रेम हाच विषय घेतला तर मग प्रेमाची गरज फक्त एका भाषेतील लोकांसाठीच आहे का? त्याची गरज फक्त पगडीवाल्यांसाठी, फक्त टोपीवाल्यांसाठी किंवा केवळ धोतरवाल्यांसाठी आहे का? किंवा विशिष्ट पोशाख घालणाऱ्यांसाठी, विशिष्ट संस्कृतीच्या लोकांसाठी किंवा विशिष्ट धर्मासाठी आहे का? नाही. प्रेमाचे महत्व अवघ्या जगाला आहे. अशाच प्रकारे जेवढ्या म्हणून सद्भावनांविषयी बोलले जात आहे त्यांच्याविषयी गुरु-पीर-पैगंबरांचा संदेश हा सर्वभौमिकच राहिलेला आहे.

The message of prophets was for whole of mankind, not just for people belonging to particular caste, creed, colour, religion or nationality but for each and every human being. The message of prophets was important then it has importance now and it will have importance always. (पैगंबरांचा संदेश संपूर्ण मानवमात्रासाठी होता. विशिष्ट जातीशी, सांप्रदायाशी, वर्णाशी, धर्माशी

राष्ट्रीयतेशी संबंधीत लोकांसाठी नव्हे तर प्रत्येक मानवासाठी आहे. पैगंबरांच्या संदेशाचे महत्व काल होते, आज आहे आणि भविष्यातही राहील. सूर्याचे महत्व केव्हा नव्हते ? सूर्याचे महत्व केवळ हिंदुस्थानापुरतेच आहे का ? या धरतिच्या अस्तित्वामध्ये फार मोठा Role (भूमिका) सूर्याचा आहे, सूर्याच्या उष्णतेचा आहे. आमच्या जीवनासाठी, आमच्या अन्नधान्यासाठी आमच्या पीकांसाठी सूर्यकिरणांचे महत्व आहे. सूर्याचे महत्व आहे, त्याला आपण कुठे समयाबरोबर बांधू शकतो ? या धरतीसाठी सूर्याचे महत्व युगानुयुगे राहिलेले आहे. याचे महत्व सत्ययुगातही होते, द्वापारातही होते आणि आज कलियुगातही आहे. अशाप्रकारे निसर्गाच्या दृष्टिकोनातून पाहिले तर आजही ते संपूर्ण विश्वासाठी लागू पडते. हे मानवा ! महापुरुषदेखील तुझ्या उध्दाराविषयी बोलतील, तुझ्या कल्याणाविषयी बोलतील, तुझ्या दर्जाबद्दल बोलतील आणि तुझ्याद्वारे वातावरण स्थापन करण्याविषयी बोलतील तर तेही Universaly (वैश्विक स्तराचे) असते. कदाचित देशा-देशांचे कायदे-कानून वेगवेगळे असतील, जे कायदे हिंदुस्थानचे आहेत ते सौदी अरेबियाचे नाहीत. Middle East Countries (मध्यपूर्वेकडील) देशांचे नाहीत किंवा Far East Countries (अतिपूर्वेकडील देश) मध्ये जाऊ तर तिथे वेगळेच कायदे-कानून आहेत तर अमेरिका आणि कॅनडामध्ये काही वेगळेच आहेत.

जर Traffic (वाहतूकी)चेच घेतले तर हिंदुस्थानात डावीकडून गाड्या चालतात आणि अमेरिका, कॅनडा, युरोपमध्ये उजवीकडून चालतात. इथे आपल्या देशात Switch (स्वीच) खाली केला तर On (सुरु) होईल तर अमेरिकेत स्वीच वर केला म्हणजे ऑन होईल. म्हणजेच प्रत्येक गोष्टीत Total diversity प्रचंड विभिन्नता आहे. कुठेही Uniformity (एकरुपता) नाही. Laws, Rules and Regulations (कायदे, नियम, विनियम) वेगवेगळे आहेत. मात्र महापुरुष-संत-गुरु-पीर-पैगंबरांनी जे संदेश दिले आहेत त्यांचे सार्वभौमिक महत्व आहे. कारण त्यांच्यामध्ये केवळ मानव समोर ठेवला आहे. मग तो मंगोलियन Feature (आकृती)चा असो किंवा कोरियन फीचर धारण करणारा असो, स्त्री असो वा पुरुष असो, अधिकारी असो किंवा कर्मचारी असो, प्रत्येकासाठी त्यांचे (संदेशांचे) महत्व आहे. म्हणूनच आपल्याला त्यावर केंद्रीत व्हायचे आहे. आम्हाला प्रेमावर केंद्रीत व्हायचे आहे, दया-करुणेवर केंद्रीत व्हायचे आहे, बंधुत्वावर केंद्रीत व्हायचे आहे; परंतु आम्ही केंद्रीत होतो भाषांवर, जातींवर, धर्मांवर, प्रांतांवर. त्यामुळेच आमचा Universal outlook (सार्वभौम दृष्टिकोन) बनत नाही. आपण मानवजातीचे अंग असूनही मानवपरिवाराचे अंग बनत नाही आणि इतरेजनांनाही त्याचे घटक मानत नाही. त्याच कारणाने भिंतीच भिंती आहेत, तक्रारीच तक्रारी आहेत, दुरावेच दुरावे आहेत. जर आपण महापुरुषांच्या शिकवणूकीवर केंद्रीत होऊ तर मग खरोखरच आपण अशा भावनांनी युक्त होऊ, असा दृष्टिकोन बाळगणारे बनू, अशी दृष्टी धारण करणारे बनू ज्यायोगे मग कोणीही कोणाकडे परकेपणाने पाहणार नाही, हीनदृष्टीने पाहणार नाही आणि मग एकोप्याच्या भावनेलाच मजबूती मिळेल. व्यवस्थेसाठी

रेषा (हद्दी) ओढल्या गेल्या असतील, शहरांच्या रेषा असतील, गावांच्या रेषा असतील, जिल्हा स्तरावरील रेषा असतील, प्रांतांच्या रेषा असतील, देशांच्या रेषा असतील किंवा Continents (खंड)च्या रेषा असतील. या रेषा निश्चितच असतील; परंतु जर मानवजातीला ईश्वराची लेकरे या रुपात किंवा याच्या परिवाराचे अंग म्हणून पाहिले आणि खरोखरच आपली श्रेष्ठ अवस्था बनली तर त्या रेषा केवळ वरकरणी (पृष्ठभागावरील) असल्याचे दिसून येईल.

म्हणूनच संतांची ती अवस्था असते ज्यामध्ये या रेषांना काहीही महत्व राहत नाही. त्यांच्यासाठी ही धरती जाती-पातीच्या रेषांमध्ये विभक्त नव्हती. त्यांच्यासाठी सगळे एक होते. म्हणूनच त्यांना समदृष्टीचे म्हणतात. ते समदृष्टीने युक्त होते, ते सर्वांना एका नजरेने पाहत असत. त्यांच्यासाठी -

न कोई वैरी, नाहि बेगाना,
सगल संग हम कउ बनि आइ।

याचाच अर्थ, या जेवढ्या म्हणून रेषा आहेत त्या केवळ पृष्ठभागावर आहेत; परंतु अज्ञानी (लोक) त्यांना ठोस बनवतात, फार मजबूत बनवतात. त्यामुळेच हे दुरावे, त्यामुळेच हा नतद्रष्टपणा, त्यामुळेच हे वैर-द्वेष, त्यामुळेच हे स्वार्थ, हे विभाजन, या तक्रारी; त्यामुळेच ही हिंसा आणि जुलुम-अत्याचार. मात्र संतांसाठी हे सर्व superficial (वरवरचे) असते, ते त्यांना फारसे महत्व देत नाहीत. त्यांच्या मनात सर्वांच्या भल्याची कामना असते व त्यामुळे ते सर्वांना आपले मानतात. ते कधीही कोणाला परके मानत नाहीत. तो उत्तराखंडचा आहे, तो बिहारचा आहे, तो हिमाचलचा आहे, तो झारखंडचा आहे, तो गुजरातचा आहे, कुठलाही असो, ते सर्वांना आपलेच समजतात आणि आपलेच मानतात. अशाप्रकारे त्यांच्याकडून सदोदित सद्व्यवहारच होतील. मनात करुणा आहे, प्रेम आहे तर मग ते हा कोण आणि तो कोण आहे हे पाहणार नाहीत, स्वत:ला सर्वांवर अर्पण करीत जातील.

गुरु गोविंदसिंहजी महाराजांच्या काळातील ते उदाहरण आहे की, जेव्हा सैनिक जखमी होत असत तेव्हा कशाप्रकारे भाई कन्हैया त्यांना पाणी पाजत असत. जो कोणी जखमी असेल त्याला पाणी पाजत. परंतु गुरु गोविंदसिंहजी महाराजांच्या सैन्यामधील काही लोक त्यांच्याजवळ गेले आणि म्हणाले की, भाई कन्हैया हे तू काय करतो आहेस ? आपले जे शत्रू जखमी झाले आहेत त्यांनाही तू पाणी पाजत आहेस. जेव्हा भाई कन्हेयांना गुरुमहाराजांसमोर उभे करण्यात आले आणि विचारले गेले की, भाई कन्हैया तुम्ही हे सर्व काय करीत होता, तुम्ही त्या लोकांच्या तोंडातही पाणी घालत

होता ? तेव्हा पुढून भाई कन्हैया म्हणाले, प्रभू! आपण जी मला दृष्टी दिली आहे त्यामुळेच ते सर्व मला एकसारखे दिसत होते. मी केवळ एवढेच पाहत होतो की, ते व्याकुळ होते आणि मी त्यांच्या तोंडात पाणी घालत होतो. त्यांना हे ठाऊक नाही की, तेही आपल्याच परिवाराचे अंग आहेत, म्हणजेच खुदाच्या परिवाराचे अंग आहेत. ते निश्चितच भरकटलेले आहेत, चुकले आहेत परंतु तुम्हीच माझ्या मनात हे भाव भरले आहेत. तेव्हा समोरुन गुरुसाहेबांनी सांगितले, "भाई कन्हैया! अगोदर तुम्ही पाणी पाजत होता आता हा मलमही घेऊन जा आणि तोही त्यांच्या जखमांवर लावा." अशाप्रकारच्या या गाथा आपण वाचू जरुर, श्रवण करुन भावविभोरही होऊ; परंतु जेव्हा ती स्थिती येईल, जेव्हा तो प्रसंग येईल त्यावेळी मात्र अजिबात ध्यानात राहत नाही, आमचा विचारही तसा नसतो आणि तशाप्रकारचा व्यवहारही नसतो.

महापुरुष-संतजन-गुरु-पीर-पैगंबर हीच शिकवण देत गेले, प्रत्येक माणसाचे लक्ष याकडे वेधत गेले जेणेकरुन मनुष्य आपला जीवनप्रवास करीत असताना सुधारावा, सर्व परिस्थितीत सावरला जावा आणि एक सुंदर वातावरण स्थापन करीत जावा. जर असे घडले नाही तर नुकसान तर होतच आले आहे आणि पुढेही होत राहील. हे फार पीडादायक आहे. माणसाकडून माणसाचे जे नुकसान करणाऱ्या या जखमा भरल्या जात नाहीत.

सांगण्याचे तात्पर्य हेच आहे की, महापुरुषांनी, संतांनी-गुरु-पीर-पैगंबरांनी जे संदेश दिले होते, कोणत्याही कालखंडात ते संदेश दिलेले असोत त्यांचे महत्व आजदेखील तितकेच आहे. प्रत्येक व्यक्तीसाठी त्याचे महत्व आहे, प्रत्येक माणसासाठी त्याचे महत्व आहे त्याची कदर करावी, ते धारण करावेत, ते आचरणात आणावेत. अशा तऱ्हेने वैराचा, ईर्ष्येचा, द्वेषाचा, असहनशीलतेचा मार्ग सोडून द्यावा आणि सहनशीलतेने युक्त व्हावे. प्रेम, एकोप्याला प्रोत्साहन द्यावे आणि प्रेमच प्रेम वाटत जावे.

थोड्यावेळापूर्वीच कबीरजींचे वचन आपण श्रवण केले की -

पोथी पढ़ि पढ़ि जग मुआ पंडित भया न कोय।
ढाई आखर प्रेम का पढ़े सो पंडित होय।

अशाप्रकारे प्रेमभावनेने युक्त होऊन द्वेषाचा मार्ग सोडून द्यावा. द्वेषाने कोणाचे भले केले आहे? द्वेषामुळे कधी कुटुंब, वस्ती, शहरांमध्ये प्रगती झाली आहे? कुठे आनंद मिळाला आहे? कुठे अशी सुखद स्थिती बनली आहे? द्वेषाने सदोदित विरान (वाळवंट) केले आहे, उजाड केले आहे, द्वेषाने सदोदित दहशत पसरवली आहे. तरीही माणूस का बरे त्या दिशेला जातो? हे मानवा! तू हा तिरस्कार, द्वेषाचा मार्ग सोडून दे आणि प्रेमभावनेने युक्त होऊन जा. प्रेम की गंगा बहाते चलो (प्रेमाची गंगा वाहवत ठेऊया) हे गीत तर आपण गात राहिलो, पण माणसाने तो मार्ग अवलंबला नाही, प्रेमाची गंगा वाहवली नाही पण रक्ताचे पाट वाहवले. म्हणूनच प्रेमाची गंगा वाहत ठेवावी आणि प्रेमच वाटत जावे. या जगाला सजवण्या-सावरण्यासाठी प्रेमाची गरज आहे. जगाचे अस्तित्व कायम टिकविण्यासाठी प्रेमाची, बंधुभावाची, एकोप्याची गरज आहे.

दास याच शब्दांनी आपली आज्ञा घेऊ इच्छितो. कारण वेळ फारच पुढे निघून गेली आहे. शेवटी पुनः एकवार हीच प्रार्थना की, दातार कृपा करो; सर्वांना सुमती देवो जेणेकरुन सगळे सुंदर आचरण करणारे बनोत. ज्यायोगे त्यांचेही भले होवो आणि वातावरणही सुंदर बनावे. अशाप्रकारे आनंद वाटत आणि प्राप्त करीत जावे. इथे उत्तराखंडमध्ये येऊन आपणां सर्वांच्या दर्शनाने फार आनंद मिळाला. मागील वर्षी इथे फारच पीडादायक स्थिती होती, उत्तराखंडामध्ये केवढा तरी प्रकोप झाला होता, फार मोठे नुकसान झाले होते. तेव्हा दातार कृपा करो, सर्वांना अशी शक्ती प्रदान करो, येणाऱ्या काळात सर्वांना आनंद मिळावा आणि अशाप्रकारे सर्व पुढे पुढे जात राहोत.

संतजनहो, धन निरंकार!

मराठी रुपांतर - स.वि. लव्हटे



आध्यात्मिक जागृती आणि आधुनिकता

- श्री. मानसिंह शिवाजी कदम
मु.पो. भुईज, ता. वाई, जि. सातारा

मनुष्याने किती जरी प्रगती केली तरी जीवनामध्ये आध्यात्माला नाकारु शकत नाही. सायन्सच्या साह्याने मनुष्याने अनेक प्रकारची सुख सुविधांची साधने निर्माण केली. परंतु त्याला मनुष्य जन्मात येऊन जे साध्य करायचं आहे त्यापासून तो दुरावला आणि आधुनिकतेच्या नावाखाली अधोगतीकडे जाऊ लागला आहे. कारण त्याला त्याची जाणीव नाही, की मनुष्य जन्म कशासाठी मिळाला, का मिळाला, कशा प्रकारचं जीवन तो जगत आहे, कशा प्रकारचं जीवन त्याला जगलं पाहिजे. ज्या रस्त्यावरुन तो चालला आहे तो रस्ता त्याच्यासाठी ठीक आहे का याचा विचार त्याने कधी केलाच नाही. कारण त्याच्या मनामध्ये, डोक्यामध्ये फक्त आणि फक्त आधुनिकता आणि नश्वर प्रगती, जी या एका ईश्वरापासून दूर घेऊन जाते. ज्याला साधू संतानी मिथ्या म्हटलं अशा मोहमायेत तो गुरफटत गेला.

म्हणून साधू, संत, गुरु, पीर-पैगंबर यांना वारंवार संदेश द्यावा लागला की हे माणसा तू माणूस बन. कवी संत कबीरजी यावर समजवतात की,

'चलती चक्की देख के दिया कबीर रोय,
दुई पाठन के बीच साबूत बचा न कोय'

जीवनाचा एक एक अनमोल क्षण वाया चाललाय. आणि दुसरीकडे मनामध्ये वैर, निंदा,घृणा, ईर्ष्या मनामध्ये घेऊन तो जगत आहे आणि आपलं जीवन वाया घालवत आहे.

एका बाजूला विकासाची उंची आहे तर दुसरीकडे मागासलेपणाची इतकी पराकाष्ठा आहे की, माणसाचं चारित्र्य हीन दर्जाचं बनलं आहे. महापुरुष समजवतात की, तू मानवी चाल चालून दाखव मग तुझे पुढे सरकणे, विकास करणे सर्व धन्यवादास पात्र आहे. मग ती मानवी चाल संताच्या सहवासात आल्यावर पूर्ण सद्गुरुची भेट होते. पूर्ण सद्गुरु परमतत्वाची, परमेश्वराची अनुभूती देतात. म्हणून म्हटलय-

'संत, गुरु, परमात्मा तीनो बडे महान,
संत मिलावे गुरुसे, गुरु मिलावे राम'

ईश्वर हा निराकार आहे. पण मनुष्यमात्राला समजवण्यासाठी साकार होऊन सद्गुरुच्या रुपाने येतो. तो आपल्या भक्तांना ज्ञान देऊन त्यांना सुध्दा महान बनवतो. जीवनाचे महत्त्व म्हणजेच निजस्वरुपाची जाण करुन घेणे. ही जाणकारी सद्गुरु शिवाय कोणीही करुन देऊ शकत नाही आणि मानव योनीशिवाय इतर कोणत्याही योनीत ही जाणकारी होऊ शकत नाही. संत म्हणतात-

पशुदेही नाही गती ऐसे सर्वत्र बोलती,
म्हणोनी नरदेहीच प्राप्ती परलोकाची

ज्याला ब्रह्मज्ञान प्राप्त झालं नाही त्याला पुन्हा जन्म मरणाच्या फेरीमध्ये जावे लागणार आहे. परंतु आज समयाचे सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज दयाळू झाले आणि अखिल विश्वाला ब्रह्मज्ञान देऊन ईश्वराची, निजस्वरुपाची ओळख करुन देतात. आधुनिकतेमुळे आध्यात्मापासून दुरावलेल्या माणसात प्रेम, नम्रता, सहनशीलता यासारख्या दैवी गुणांची जागृती करुन देतात.

'जिवंत शिक्षक' पुस्तकातून साभार

गुरुभक्ताचा व्यवहार पवित्र व स्पष्ट असावा

एका शुध्द आणि निरोगी समाजाची निर्मिती करण्यासाठी बाबा गुरबचनसिंहजी रात्रं-दिवस प्रयत्नशील राहिले. जे अज्ञानाच्या अंधारात चाचपडत आहेत, ज्यांनी प्रकाशाची किरणंसुध्दा पाहिली नाहीत ते जर ठोकर खात असतील किंवा धडपडत असतील तर ती गोष्ट वेगळी आहे. परंतु जे ज्ञानवान आहेत, ज्यांना उजेडाची ओळख झालेली आहे असे लोक तरी निदान अशी ठोकर खाण्यापासून स्वत:ला वाचवू शकतील, यासाठी बाबाजींची सदैव एकच ध्यान, तळमळ होती. ज्यांची दृष्टी व्यवस्थित आहे व उजेडही स्पष्ट दिसत आहे, परंतु जाणूनबुजून डोळे बंद करुन घेतले आहेत अशा लोकांची खरोखरच कीव करावीशी वाटते. अशा लोकांना समजाविण्यासाठी सद्गुरुला कित्येकदा सक्तीचा वापरदेखील करावा लागतो.

असाच एक दृष्टांत दास सादर करत आहे. बाबा गुरबचनसिंहजी जेव्हा गुरुगादीवर विराजमान झाले तेव्हाची गोष्ट आहे. त्यांच्याजवळ काही महात्माजन आले आणि आपले गाऱ्हाणे सांगायला लागले, "अमुक एका महापुरुषाने आम्हाला परमशक्ती निराकाराशी जोडले असून सेवा, नामस्मरण व सत्संगाची वाट दाखविली आहे. ब्रह्मज्ञान त्यांच्याकडून घेतले आहे, म्हणून आम्ही प्रेम आणि श्रध्देपाई त्यांना शहनशाह म्हणून हाक मारत आलो आहोत, कारण आमच्या विभागात प्रचारासाठी बहुदा तेच येत असतात. त्यामुळे हळूहळू महापुरुषांचा त्यांच्याबद्दलचा विश्वास वाढत गेला. परंतु आता ते महात्मा आमच्या या विश्वासाचा गैरफायदा घेऊन मायावी लाभ उठविण्याच्या मागे लागले आहेत. त्यांनाही मायेने आपल्या गराड्यात वेढून टाकले आहे. त्यांनी कित्येक महापुरुष आणि त्यांच्या नातेवाईकांचे मोठमोठ्या रकमांचे विमे करुन घेतले आहेत. तसेच त्यांच्याकडून पैसे घेऊन स्वस्त दराने जमीन खरेदी करण्याच्या नावाखाली फसवणूकही केली आहे. जमीन तर खरेदी केली आहे. परंतु जमिनीचे भाव वाढल्याने मिळणारा सर्वच्या सर्व फायदा ते स्वत: गिळंकृत करु पाहात आहेत. आणखी पैसे द्या, अमुक जमीन घेऊन देतो असे आम्हाला सांगतात. आमच्या जवळ तर आणखी पैसा नाही. ते आम्हाला जमीनही देत नाहीत आणि आमचे पैसेही परत करत नाहीत."

ही गोष्ट ऐकून बाबाजी अतिशय गंभीर झाले आणि त्या फिर्यादी महापुरुषांना आपल्याबरोबर घेऊन शहनशाहजींच्या (अवतारसिंहजी) समोर फिर्यादींची तोंडी फिर्याद सादर करण्यासाठी हजर झाले. शहनशाहजी हसले व म्हणाले, "आपणदेखील त्या महापुरुषाला शहनशाह असे म्हणत होता ना, आता त्याने आपले अस्सल स्वरुप दाखविले आहे. मी तर नेहमीच तुम्हा लोकांना सावध करत असतो, की संतांसोबत नामाचाच व्यवहार करा. मायेची देवाणघेवाण स्वच्छ व स्पष्ट असायला पाहिजे. कधीही कोणाबरोबर बहाणा करु नका, कोणाचीही फसवणूक करु नका, कोणालाही तोंडघशी पाडू नका आणि कोणाच्याही हक्कावर गदा आणू नका असे मी सांगत आलो आहे. जर कोणी वचनाप्रमाणे चालत असेल तर तो स्वत: सुखी होतो आणि वचनाप्रमाणे चालत नसेल तर मग मन:स्ताप भोगावाच लागेल. मी आज आपणासही सांगत आहे की आपण जेव्हा एखाद्या महापुरुषाची त्याच्या पात्रतेपेक्षा अधिक प्रशंसा करुन त्याला आकाशाला हात टेकवायला लावता अथवा त्याला इतका मानसन्मान देता, जो त्याच्या मनरुपी भांड्यात सामावू शकत नाही; तेव्हा आपण त्याच्यासाठी परीक्षा-पत्र बनता. लक्षात ठेवा की गुरु हा गुरु असतो आणि शिष्य हा शिष्यच असतो. चला, ठीक आहे. तरीही बाबाजी जे सांगतील ते करा."

या घटनेने बाबाजींच्या अंतरंगात किती गांभीर्य उत्पन्न केले हे दास पाहातच होता. बाबाजींनी त्या महापुरुषाला निमंत्रण पाठविले आणि याप्रकारे सावध केले, "कोणत्या मायाजाळात फसलेले आहात. ज्या सद्गुरुने नेहमी आपल्या विचाराद्वारे आपणास सांगितले आहे की, कोणाशीही कारस्थान करु नका, कोणाचे घेऊन त्याला तोंडघशी पाडू नका, कोणाच्याही

हक्कावर गदा आणू नका, गुरुच्या शिष्याचा हक्क हिरावून घेऊन, फसवणूक करुन आपण काय मिळवाल? आपल्यासारख्या विशेष व्यक्तीची गोष्ट तर दूरच राहू द्या, पण एखाद्या साधारण गुरुभक्तालाही ही गोष्ट शोभायमान नाही. अशा प्रकारामुळे आपल्या जवळ पैसा अडका राहात नाही, कीर्ती टिकून राहात नाही आणि भक्तीचा आनंददेखील मिळत नाही. या महापुरुषांचं तर केवळ आर्थिक नुकसानसुध्दा होत आहे. त्यासाठी दुसऱ्याकडून हिसकावून घेतलेले धन आपलेही धन बुडवून टाकतं. एकतर यांच्या वाट्याची जमीन त्यांना देऊन टाका अथवा यांनी आपल्याला जी रक्कम दिलेली आहे ती व्याजासह परत देऊन टाका; यातच आपली सुटका आहे." बाबाजींनी अशाप्रकारे समजाविल्यानंतर त्या महापुरुषाने आपल्या अंतर्मनातून क्षमा मागितली. सद्गुरुंनी तर क्षमा केलीच; परंतु यापुढे गुरुमतानुसार चालण्याचा आदेशही दिला.

बाबाजींनी दिलेला निर्णय ऐकून दासला जाणवलं की ज्याप्रमाणे पावसाळा सुरु होण्यापूर्वीच समजुतदार आई लहान मुलांना फोड-पुटकुळ्यापासून वाचविण्यासाठी कडवट औषध प्यायला देते. त्याचप्रमाणे सद्गुरुसुध्दा अनेक प्रकारांनी आपल्या शिष्याला कधी प्रेम करुन तर कधी कडवट वचन बोलून वाचविण्याचा प्रयत्न करतात. सद्गुरुच्या दटावण्यातही प्रेम लपलेलं असतं ही गोष्ट शिष्याने ध्यानात ठेवायला पाहिजे.

या घटनेसंबंधात दासला कपूरथळा येथील भापा रामचंदजी यांची आठवण होत आहे. ते नेहमी आपल्या विचाराद्वारे सांगत असत, "गुरुमुखांनो, महापुरुषांनो, गुरु सागरासमान असतात आणि शिष्य पेल्यातील पाणी. सागरात रंगाच्या लाखो गोणी ओतून टाकल्या तरी सागराचा रंग काही बदलत नाही. परंतु पेल्यातील पाण्यात रंगाचे एक-दोन थेंब जरी पडले तरी त्या पाण्याचा रंग बदलून जातो. गुरुचा सन्मान व यशोगान त्यांच्यासमोर कितीही करत जा, त्यात किंचितही फरक पडत नाही. या उलट शिष्याची प्रशंसा नेहमी त्याच्या पाठीमागे करा आणि शिष्याला सूक्ष्म अभिमानापासून वाचवा. जर शहनशाहजी यांना शहनशाह म्हटले तर तिथे काहीही फरक पडणार नाही परंतु एखाद्या साधारण मनुष्याला शहनशाह, दीनदयाळ, मालक, महाराज आदी नावांनी संबोधित करतो (हाक मारतो) अशावेळी जर काही क्षणाकरिता या शब्दांना आपल्या सोबत त्याने जोडले तर त्याचे निश्चित नुकसान आहे. यासाठी आपण संताचा सन्मान, सत्कार, सेवा तर अवश्य करा परंतु त्यांना कोणत्याही परीक्षेला सामोरे जायला लावू नका."

प्रस्तुती - श्री. जे.आर.डी. 'सत्यार्थी'
(जिवंत शिक्षक)
मराठी अनुवाद - श्री. जगन्नाथ मडकर

दिव्य गुणांना धारण करुनी जीवन बाग सुगंधीत करुया

एकदा सांगू काय झालं, पटकन माझ्या मनात आलं,
जो आला तो जाणार आहे, तर मीही एक दिवस मरणार आहे.
मग अस काय करता येईल मरुनही जिवंत राहता येईल,
अगदी सहजपणे आपल्यालाही ते शक्य होईल,
कारण संतांनी म्हटले आहे, 'मरावे परि कीर्तीरुपे उरावे'
म्हणून मलाही वाटलं आपणही तसं काहीतरी करावे.
ज्याक्षणी हा विचार माझ्या मनात आला, त्याक्षणी माझ्यातील सद्भक्त जागा झाला.
(मला) अगं बाई, तुलाही ते जमणार आहे,
त्यांच्यासारखंच कर्म तुही जीवनात जर करणार आहे.
म्हणून तूही आठव त्या शीलवान महापुरुषांना,
महावीर अन कर्मवीर त्या थोर ज्ञानीवंताना.
ज्यांनी सर्व मानवमात्रावर मनापासून प्रेम केलं,
मानवतेच्या भल्यासाठी सर्वस्वाचं दान दिलं.
त्यांनी एकत्वाला स्वीकारलं, विषमतेला नाकारलं
भेदभावाच्या विरुध्द त्यांनी, युध्द होतं पुकारलं,
ते विशालतेने जगले, माणुसकीने, परोपकाराने वागले
म्हणूनच ते सर्वांसाठी खूपच होते चांगले.
त्यांच्यात आपलेपण होते, मानवतेचे गुण होते,
सदगुणी ते महामानव चारित्र्याने महान होते.
असे एक नव्हे दोन नव्हे अनेक संत महंत आहेत,
ते शरीररुपाने गेले तरी कर्माने आज जिवंत आहेत.
मग बोल, जर का, त्यांच्यासारखंच मरुनही जिवंत राहायचं आहे,
तर त्याच्यासारखंच तुलाही ते कर्म महान करायचं आहे.
सर्वांसाठी जगायचं आहे, माणुसकीने वागायचं आहे,
मानवमात्राच्या हितासाठी कर्तव्याला जागायचं आहे.
'कर्मानेच माणूस पूजला जातो', सत्य तुही ध्यानात धर,
दिव्य गुणांना धारण करुनी जीवनात नेक कर्म कर.
मग सर्वत्र तुलाही पुजले जाईल, कीर्ती तुझीही गाईली जाईल,
हे तुलाही शक्य आहे, गुरुमतावर जर चालता येईल.
सद्भक्ताचा सद्बोध हा, पटला माझ्या मनाला,
'संगीता' दोन्ही हात जोडूनी विनंती करते तुम्हाला.
या सदगुरुच्या सद्वचनांना जीवनामध्ये आचरुया,
दिव्य गुणांना धारण करुनी जीवन बाग सुगंधीत करुया.

सौ. संगीता चव्हाण
फोंडा, गोवा

स्व-परिवर्तनातून - समाजपरिवर्तनाकडे

साधसंगत, हे सर्व डायग्नॉसिस सेंटर्स अर्थात मनातले रोग जाणून घेण्यासाठी जागोजागी या सत्संगाचं आयोजन केलं जात आहे. प्रत्येक वेळी यामध्ये आपण स्वत:ला चेक करत राहीलं पाहिजे. कारण स्वत:चं निरीक्षण करणं, यापेक्षा मोठी कोणतीही तपासणी किंवा टेस्ट नाही. केवळ स्वत:कडे लक्ष द्यायचं आहे. मी दुसऱ्यांशी बोलतो तेव्हा नक्की कोणत्या पद्धतीने बोलतो ? कोणाला काही समजवत असतो तेव्हा त्याच्याशी नक्की माझं वागणं कसं असतं ? मी त्या व्यक्तीवर किती हक्क गाजवतो आणि या प्रोसेसमध्ये माझा अहंकार किती बळावतो, माझ्या चेहऱ्यावर त्या वेळेस कसे हावभाव असतात ? हेच ते छोटे-छोटे भाव माझ्या जीवनात अगदी मोठे बदल घडवून आणतात आणि माझ्या जीवनाची दिशाच बदलते.

महापुरुष नेहमी एक गोष्ट सांगतात, एक राजा होता. त्याने एक सुंदर महाल बनवला, त्या राजाची श्रीकृष्णावर गाढ श्रद्धा होती म्हणून त्याने एका चित्रकाराला बोलावून घेतलं आणि त्याला महालाच्या एका खास हॉलमध्ये कृष्णलीलांचे चित्रण करायला सांगितले. राजा त्या चित्रकाराला म्हणाला, श्रीकृष्णाच्या जीवनातल्या लहाणपणापासूनच्या सर्वमहत्वाच्या प्रेरक प्रसंगांचं जिवंत चित्रण असणं अत्यंत महत्वाचं आहे. हे ऐकल्यावर चित्रकारानेही एक अट घातली. तो म्हणाला, मी हे चित्रण करायला तयार आहे, पण कृपा करुन आपण माझ्यावर वेळेची कुठलीही मर्यादा घालू नका. मला शक्य झालं तर मी हे चित्रण एका वर्षातसुद्धा पूर्ण करीन किंवा मग ह्या कामाला अनेक वर्षसुद्धा जातील. हे ऐकल्यावर राजा होकार देत म्हणाला, चालेल पण चित्र अगदी जिवंत आणि मनाला शिकवण देणारी असावीत आणि मग तो चित्रकार मिळालेल्या या कार्यासाठी सज्ज झाला. चित्रात जिवंतपणा आणण्यासाठी तो हुबेहुब श्रीकृष्णासारखा वाटेल असा चेहरा शोधू लागला आणि त्याला एक लहान मुलगा मिळालाही, मग त्याने त्याच चेहऱ्यावरुन श्रीकृष्णाच्या बालपणातल्या प्रेरक प्रसंगाचं चित्रण केलं आणि त्यानंतर अजून एका मोठ्या मुलाला घेऊन आणखी काही प्रसंगांचं केलेलं चित्रण त्या खास हॉलमध्ये शोभून दिसत होतं. या सर्व प्रक्रियेमध्ये जवळपास १०-१५ वर्षे निघून गेली आणि आपल्याला तर माहितच आहे की कंसाच्या चित्रणाशिवाय कृष्णलीला संपन्न होऊच शकणार नाही. पण मग असा चेहरा भेटणार तरी कुठे, ज्याच्याकडे पाहून कंसाचा क्रूरपणा आठवेल. एके दिवशी त्याला घाबरलेल्या अवस्थेत एक माणूस आपला जीव मुठीत घेऊन धावताना दिसला. त्याच्या पाठोपाठ एक अक्राळ विक्राळ मुद्रेचा माणूस हातात भला मोठा सुरा घेऊन धावत होता. त्याला पाहताक्षणी चित्रकाराने सैनिकांना त्या माणसाला धरुन आणायला सांगितले. त्या माणसाला सैनिकांनी चित्रकारासमोर आणल्यावर, त्याला पाहून चित्रकार कंसाचे चित्र काढू लागला. तेव्हा तो माणूस त्या चित्रकाराकडे पाहून अगदी जोरजोरात रडायला लागला. चित्रकार हे पाहून थोडा हबकलाच, तो म्हणाला अरे तुला अचानक रडायला काय झालं ? तेव्हा तो माणूस म्हणाला, अहो माझ्या लहानपणी तुम्ही मलाच पाहून बालपणीचा कृष्ण रेखाटला होता आणि आज बघा, माझ्यावर ही काय वेळ आली आहे की तुम्ही मलाच पाहून कंसाचं चित्र काढत आहात.

साधसंगत, आपला समाज कधी आपल्यामधल्या कृष्णाचं रुपांतरण कंसात करेल, हे काही सांगता येणार नाही. जगातलं हे वाईट भावनांचं, दुष्ट प्रवृत्तींचं प्रदूषण आपल्यावर किती प्रभाव करत असतं,याची तर आपल्याला तिळमात्रसुद्धा जाणीव होत नाही. आपल्यामध्येच कृष्ण आहे आणि आपल्यामध्येच कंससुद्धा आहे. कधी आपण कृष्णासारखे दैवी होऊन समस्त जग आपलं मानत जीवन जगत असतो तर कधी आपणच कंसासारखे हिंसक होतो आणि इतक्या खालच्या थराला पोहचतो की कोणी एखादी व्यक्ती जरी आपल्या बाजूला येऊन बसली तरीही आपल्याला अपमान झाल्यासारखा वाटतो आणि आश्चर्य तर याचं आहे की आपल्यामध्ये हे दोन्ही बदल सतत घडत असतात आणि आपल्याला त्याची जाणीवही नसते.

सद्गुरु बाबाजींची असीम कृपा आहे की त्यांनी

माणसांच्या बोलीभाषेला, वेषभूषेला, संस्कृतीला बदललं नाही. कोणी मराठी आहे तर तो भाषेने मराठीच आहे. जसं आता या सत्संगातसुद्धा संत महात्मा बोलत होते की या अध्यात्मिकमुळे मराठी, पंजाबी, गुजराती, बंगाली किंवा सिंधी अशा प्रकारचे लोक आहेत असे मुळीच जाणवत नाही. सर्वप्रथम आपण सर्व माणसं आहोत हे भाव सद्गुरुने आपल्यामध्ये प्रस्थापित केले आहेत. ह्या प्रकारचे भावच दाखवतात की आपल्यामधला कृष्ण जागृत आहे. साधसंगत ह्याच भावनेमुळे आपण कुठल्याही क्षेत्रातील असू, कोणतंही काम करत असू मग कोणत्याही प्रकारची मानसिक बाधा आपल्यासमोर येत नाही. भलेही मी एखादं छोटसं दुकान चालवत असेन, एखादी छोटी मोठी नोकरी करत असेन किंवा माझा एखादा मोठा बिजनेस असेल, मी मोठा व्यापारी असेन; मला फक्त एक गोष्ट लक्षात ठेवणं गरजेचं आहे की माझ्यामधला कंस कधीही जागृत होता कामा नये. त्या कंसाचे भाव धारण करुन जर आपण जीवन जगलो तर मग जीवनाची दिशा ही विनाशाकडेच वाटचाल करणारी असेल आणि जर का या कंसाच्या विचारधारणेला विसरुन मी कृष्णाला आपल्या जीवनात प्राथमिकता दिली, ते शुद्ध भाव माझ्या आयुष्यात सदैव तेवत राहणार असतील तर मग जीवनातली सर्व कार्ये आपोआप सरळ मार्गाने होत जातील.

आताच महापुरूष आपण प्रवेश केलेल्या २०१० वर्षाबद्दल विशेषणं देऊन म्हणत होते की आता आपण दशमद्वारामध्ये प्रवेश करत आहोत. दासने हे ऐकल्यावर अजून एक गोष्ट ध्यानात आली की एक भाव असाही असू शकतो की २१ व्या शतकातलं दस नंबरी वर्ष चालू झालं आहे. साधसंगत वर्ष तर २०१० हेच आहे पण जर आपण त्याला दशमद्वाराशी जोडलं तर ते आपल्यासाठी दशमद्वार झालं आणि दसनंबरीशी जोडलं तर दसनंबरी झालं. ते दसनंबरीपण (खोटेपणा) आपल्यात आहे आणि ते दशमद्वारदेखील आपल्यातच आहे. यातून आपल्याला कोणत्या मार्गावर जायचं आहे हे पहावं लागेल. जर आपल्याला कधीही असं वाटलं की आपण सत्याचा मार्ग सोडून असत्याच्या मार्गावर गेल्याने आपला विकास होईल तर ती आपली सर्वात मोठी चूक ठरेल.प्रत्येक दिवशी आपल्या मनातला हा भाव दूर करावा लागेल की कोणत्याही भ्रष्टाचाराच्या मार्गावर चालून आपण सर्वप्रथम येऊ तर हा भाव आपल्यासाठी घातक आहे. केवळ आणि केवळ सत्य आणि चांगुलपणाच्या मार्गावर चालूनच आपला विकास संभव आहे आणि सद्गुरुने तर आपल्याला प्रेम, नम्रता, विशालतेचा मार्ग दिला आहे. यावर चालूनच आपली प्रगती संभव आहे. हा भाव आपल्या मनामध्ये आल्यावर आपोआप आपल्यामधला तो कृष्ण जागृत होतो आणि अगदी सहजतेने आपल्या भोवतालचं वातावरण सुखमय दिसू लागतं आणि सगळ्यात मोठी तसंच महत्वाची गोष्ट म्हणजे, या भावनेने जग बदलेल की नाही यावर माझा ताबा, माझा कंट्रोल नाही पण यामुळे माझं जीवन नक्कीच बदलेल यात तिळमात्रही शंका नाही.बाबाजींनी एकदा आपल्या प्रवचनात म्हटलं होतं, की जर आपण जगातले, रस्त्यावरचे सगळे काटे हटवण्याचा प्रयत्न करत बसलो तर ते कदाचित शक्य होणार नाही; पण आपले पाय काट्यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी मजबूत तळ असलेले जोडे नक्कीच घालू शकतो, ज्यामुळे काटे रुतणार नाहीत.

साधसंगत, कोणतंही कार्य करत असताना जर भक्तीचा भाव असेल तर मग आपण भक्ती करतो असं मानता येईल. भक्तीचा भावच जगातल्या वैर, ईर्ष्यारुपी काट्यांपासून आपलं संरक्षण करत असतो. आपल्या मनात कोणाच्याही प्रति दुर्भाव असू नये. दासला नेहमी प्रीतजी कर्नालचे महान संत यांच्या काव्यपंक्तीआठवतात,

कोई की करदा, ए मैनु की, जो नही करना, मै ना करा

कोण काय करत आहे हे पाहण्यापेक्षा मला स्वत:मध्ये सुधार करणं जास्त आवश्यक आहे. मी जगाला सुधारण्यासाठी आलेलो नाही. मी जे काम करण्यायोग्य नाही ते मी करु नये. जर आपण स्वयंसुधार साधला तर मग वास्तविकता तर हीच ना की हे जग तुम्ही आणि मी मिळूनच तर बनलं आहे.

अपनी बुराई तो कोई देखता नही,
कहते है लोग की जमाना खराब है

आपण केवळ स्वत:चा सुधार करण्याची जबाबदारी पार पाडली तर मग विचार करा, तुम्ही आम्ही मिळून बनलेलं हे जग सुधरायला किती वेळ लागेल. पण नेमकं हेच तर आपल्याकडून होत नाही. साधसंगत आशीर्वाद द्या, की हे सारे बदल माझ्याही जीवनात घडावे. आपण हे केवळ म्हणतच राहू नये 'तेरा रुप है यह संसार', खरंच हे मानणं गरजेचं आहे की देवा तुझंच रुप आहे, हे जग आणि तूच कणाकणात विराजमान आहे. प्रत्येकामध्ये तुझंच रुप दिसावं. मग आनंदच आनंद. तो दिवस वर्षाचा पहिला दिवस असो किंवा नसो, म्हणतात ना, जब जागो तब ही सवेरा.सद्गुरुचरणी हीच प्रार्थना आहे की, आधीचे अवगुण क्षमा करुन पुढचं मार्गदर्शन असंच करत रहा.

संग्राहक - सौ. सरीता नयन तळवडेकर (कुर्ला, मुंबई)
मराठी रुपांतर - श्री. अमित अनिल चव्हाण (ऐरोली, नवी मुंबई)

अनुभवाचे बोल

अशी भेटली गुरुमाई ...

- श्री. अनिल माने
मु.पो. तुकाई नगर

मी पंढरपूर तालुक्यातील रांझणी येथे शिक्षक म्हणून सेवेत होतो, त्यावेळची ही गोष्ट.

पूर्ण गुरुची कृपा कधी आणि कोणावर होईल हे सांगता येत नाही. अशाच प्रकारे दासच्या जीवनातील प्रसंग. जालन्याला प.पू. गरड गुरुजी यांच्याशी दासची भेट झाली. चर्चा करता करता त्यांनी या सत्य ईश्वराचं ज्ञान दिलं. पण तरीही विश्वास बसेना. माझी चंचल अवस्था पाहून गरड गुरुजी बोलून गेले की कमीत कमी संकट आल्यावर तरी या निराकाराचा मंत्र म्हणा. त्यांचं एवढं मनावर न घेता सायं. ६ वाजवा घरी आलो. दासचा एक भाऊ रत्नागिरी जिल्ह्यात शिक्षक म्हणून सेवेत होता, त्याच्या बदलीसाठी प्रयत्न चालू होता. मेव्हण्यांचा फोन आला की आजच्या आज रात्रीच तुम्ही रत्नागिरीला निघा आणि बदलीचा प्रस्ताव घेऊन या, त्यांचं काम होईल, उद्या शेवटची तारीख आहे. पुन्हा प्रस्ताव मिळणार नाही.

आम्ही त्याच रात्री बारा वाजता बाईकने निघून ४०० कि.मी. चे अंतर पार करुन सकाळी ११ वाजेपर्यंत रत्नागिरीला पोहचायचं ठरवलं. मी आणि माझे सहकारी आम्ही गावाकडून मंगळवेढा येथे आलो. पेट्रोल पंपवाल्याला उठवलं आणि पेट्रोल भरलं. रात्रीचा एक वाजला होता. तेथून सांगोला व सांगोल्याहून पुढे निघालो. मी मागे बसलो होतो. गाडी चालवणारे सहकारी (गुरुजी) म्हणाले, काहीतरी बोला नाहीतर झोप लागेल.

मग काय बोलायचं... तर पटकन दुपारी गरड गुरुजींशी झालेली चर्चा आठवली आणि त्यांना सारी हकीकत सांगू लागलो. प्रवास आणि चर्चा चालू होती. सारं जग झोपलेलं. थंडी वाजू नये म्हणून रग पांघरुन मीही मागे बसलो होतो आणि अचानक बाईकचा टायर पंक्चर झाला. ८० ते ९० च्या वेगात असणारी गाडी त्यांनी कशीबशी सावरली. एकदम काळाकुट्ट अंधार. पुढेही कोणी नाही आणि मागेही नाही. रात्री दीडचा सुमार. आता काय करावं हे सुचत नव्हतं. तेवढ्यात आमचे सहकारी म्हणाले, तुम्ही मघाशी सांगत होता ना, की आज कुणीतरी महात्मा भेटले, त्यांनी संकट आल्यावर म्हणायचा मंत्र दिला आहे. मग म्हणा की आता मंत्र. संकट आलय. मी म्हणालो, ठिक आहे, तुम्ही गाडी धरा मी पाठीमागून 'तू ही निरंकार, मै तेरी शरण हाँ, मैनु बख्श लौ' असे म्हणत म्हणत मोटार सायकल ढकलू लागलो. असं करत करत आम्ही जेमतेम शंभर ते दीडशे फूट आलो असेन अन् अचानक ते म्हणाले, ते बघा समोर पंक्चरचं दुकान दिसतय. ट्यूब लाईट चालू होती. बाहेर उजेड पडला होता. जवळ जाऊन पहातो तर दुकानावर लिहीलं होतं 'निरंकारी पंक्चर दुकान'. मला एकदम सुखद धक्काच बसला. आपण ज्याचं नाव घेतोय त्याच नावाचं दुकान! मी दारावर थाप मारुन दुकानदार महात्म्यांना उठवलं. महात्मा बाहेर आले त्यांनी आमचं दर्शन घेतलं. कुणापुढेही न झुकणारे आम्ही भयाण अंधाराला आणि परिस्थितीला घाबरुन पटकन महात्माजींचे पाय धरले.

ते म्हणाले, मी पंक्चर काढतो तोपर्यंत तुम्ही दुकानात झोपा. आम्ही त्यांच्या दुकानातील चटईवर झोपी गेलो. नंतर थोड्या वेळाने महात्माजींनी आम्हाला उठवलं. म्हणाले, आता रात्रीचे पावणेतीन वाजले आहेत. पहाटे लवकर जा. आम्ही सांगितलं आता थांबायला वेळ नाही हळूहळू आम्ही जातो. महात्माजींना पंक्चरचे पैसे घेण्यास विनंती केली; परंतु ते म्हणाले, नको. पाहिजे तर तुम्हालाच शे-पाचशे रुपये देतो. आम्ही त्यांचे आभार मानून त्यांचे दर्शन घेऊन पुढल्या प्रवासासाठी निघालो. गाडी चालू केली गाडीच्या दिव्याच्या उजेडात पुढचा मैलाचा दगड दिसला. त्यावर लिहीलं होतं - नागज २५ कि.मी. त्यानंतर आम्ही पुढच्या प्रवासास निघालो. सकाळी ११ वाजता रत्नागिरीस पोहोचलो तेथून प्रस्ताव घेतला. जेवण व थोडा आराम करुन आम्ही दु. ३ वाजता रत्नागिरीहून निघालो. सांगोलीत येईपर्यंत रात्री नऊ वाजता बारीक बारीक पाऊस पडू लागला म्हणून तिथेच मुक्काम केला. तिसऱ्या दिवशी सकाळी अंघोळ, चहा-नाष्टा करुन निघताना पंक्चर काढलेल्या महात्माजींसाठी एक किलो सफरचंद घेतले. सोबत असणारे गुरुजी गाडी चालवत होते आणि नागज २५ कि.मी. असं लिहीलेला मैलाचा दगड कुठं आहे हे पाहू लागलो. शेवटी ते ठिकाण आलं. पाहतो तर काय तिथं दुकानही नाही आणि लाईटही नाही. आम्ही स्वतःला ज्ञानी समजणारे M.A.B.Ed. पर्यंत शिक्षण घेतलेले दोघेही चक्रावून गेलो. कारण ठिकाण हेच आहे पण दुकान नाही. त्याच ठिकाणी एक मेंढपाळ मेंढ्या राखताना दिसला त्याला विचारलं, इथं एक पंक्चरचं दुकान होतं. काय झालं ? तो म्हणाला, मी इथलाच आहे माझं अख्खं आयुष्य इथं गेलं; पण मला ह्या दहा कोसात रस्त्याच्या कडेला दुकान नाही दिसलं. अशी पंक्चरची दुकानं कुठं असतात ? गावात ह्या भागात कसं असेल दुकान ?

ज्ञान देऊन गुरुने ज्यावेळी मला स्वीकारलं, तेव्हा मी जरी मानलं नाही तरी गुरुने माझ्या रक्षणाची जबाबदारी त्याच क्षणी स्वीकारली होती. तारक मंत्र देऊन संकटकाळी मदतीला धावून आला.

शेवटी हेच म्हणावेसे वाटते अशी भेटली गुरुमाई ... कसा होऊ मी उतराई ?

असे चमत्कार प्रत्येकाच्या जीवनात होतात असे नाही, परंतु सद्गुरुची अपरंपार कृपा असल्याने ते भरकटलेल्या भक्ताला अशा प्रकारची लीला करुन निरंकाराशी जोडण्याचा प्रयत्न करतात व त्याचा निरंकारावर विश्वास दृढ करतात. त्यामुळे भक्ती चमत्कारासाठी केली जात नाही. भक्तीचा उद्देशच मोक्ष मुक्ती आहे.

(ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल शंका घेणाऱ्यांच्या बाबतीत असे अनेक चमत्कार घडतात. परंतु एकदा का वास्तविक सत्याची ओळख झाली की महात्मा चमत्काराची अपेक्षा करत नाही. चमत्काची वर्णने करणं किंवा चमत्काराचा प्रचार हा मिशनचा हेतू नाही तर मोक्षप्राप्ती हाच मुख्य हेतू आहे किंवा निव्वळ दैववादी बनत नाही - संपादक)

संयमाने क्रोधावर विजय

एकदा भगवान श्रीकृष्ण, मोठा भाऊ बलराम आणि मित्र सात्यकी(महाभारत युध्दात यादवांचा एक वीर सेनापती) रात्रीच्या वेळी आपला रस्ता चुकले. घनघोर जंगल होतं. रात्रीच्यावेळी तेथेच विश्राम घेण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी हे निश्चित झाले की, तिघांनीही आळीपाळीने पहारा करावा.

पहिली पाळी सात्यकीची होती. त्यामुळे दोघेजण झोपले. काही वेळेनंतर एक पिशाच्य झाडावरुन खाली उतरले आणि सात्यकीला युध्दाचे आव्हान केले. पिशाच्याची ललकारी ऐकून सात्यकी अत्यंत क्रोधीत झाला. दोघेही युध्द करण्यास भिडले. सात्यकी जितका अधिक क्रोध करायचा तितका पिशाच्याचा आकार वाढत असे. युध्दात सात्यकीला खूपच जखमा झाल्या आणि शेवटी तो धरतीवर कोसळला, तेव्हा पिशाच्य निघून गेले.

एक प्रहर निघून गेला, आता बलराम भाऊ जागा झाला. सात्यकीने त्याला काहीही सांगितले नाही व तो झोपी गेला. बलरामालाही पिशाच्याची ललकारी ऐकू आली. आणि क्रोधाने तो पिशाच्याला जाऊन भिडला. जितका ते क्रोध करीत तितकेच पिशाच्य आकाराने वाढत असे. लढताना एक प्रहर निघून गेला. त्याचीही सात्यकीसारखी अवस्था झाली.

आता जागे राहण्याची पाळी श्रीकृष्णाची होती. बलरामानेही त्यांना काहीही सांगितले नाही आणि तो झोपी गेला. श्रीकृष्णासमोर पिशाच्याचे आव्हान आले. पिशाच्य जितक्या अधिक क्रोधाने आव्हान द्यायचा, श्रीकृष्णही तितक्याच शांत भावाने स्मितहास्य करीत आणि पिशाच्याचा आकार घटत असे. शेवटी पिशाच्य एका मुंगी एवढे राहिले आणि श्रीकृष्णाने आपल्या उपरण्याच्या टोकाला त्याला बांधले.

सकाळी सात्यकी आणि बलदेवाने आपल्यावर ओढवलेल्या प्रसंगाची माहिती जेव्हा श्रीकृष्णाला सांगितली तेव्हा स्मितहास्य करुन तो कीडा दाखवत श्रीकृष्ण म्हणाला, हाच तो क्रोध आहे. तुम्ही जितका क्रोध करायचे तितका याचा आकार वाढत असे, परंतु मी याच्या क्रोधाचे उत्तर क्रोधाने न देता शांत भावनेने दिल्याने हा हताश होऊन दुर्बळ आणि लहान बनला.

शेवटी काय तर क्रोधावर विजय मिळविण्यासाठी क्रोधाने नव्हे; तर संयम आणि सहनशील भावनेने पाहिल्यास क्रोध स्वत:च समाप्त होतो.

❁❁❁

सद्गुरु महिमा

सद्गुरु ज्ञान तुझे महान,
मिळता झालो मी धनवान ।।धृ।।

तुझ्या चरणाची लागता गोडी,
तुटली आमची यम बेडी ।।१।।

संत संगतीचा लागला छंद,
संसार झाला प्रेम सुगंध ।।२।।

सहज घडता संत सेवा,
लागला सुखाचा ठेवा ।।३।।

सदा नामाचा लागो ध्यास,
म्हणे दास 'भिकाजी' पुरवावी आस ।।४।।

श्री. भिकाजी लाड
कांजूर गाव, मुंबई

लहानपण देगा देवा

- श्री. मंगेश मधुकर खरे
दादर, मुंबई

लहानपणीच्या काही गोष्टी आज इतक्या वर्षानंतर आठवतात तेव्हा मन भारावून जातं. जी गोष्ट घडून गेली ती पुन्हा होणार नाही हे नक्की. ठराविक घटना डोळ्यांसमोरुन सरकताना दिसतात.

बालपण पुन्हा येणार नाही, कारण माझा प्रवास जन्माकडून मृत्युकडे जाणारा आहे. माझं वय वाढत आहे. आयुष्य किती शिल्लक आहे ठाऊक नाही परंतु जे आहे ते तरी सुख समाधानाने जगावे अशी प्रामाणिक इच्छा आहे. कारण भविष्य मला माहित नाही.भूतकाळ चघळत बसण्यात अर्थ नाही मग वर्तमानातच जगायला हवं. प्रत्येकालाच मोठं व्हायचं आहे, शिखर गाठायचं आहे.

मेडीकल स्टोरमधून औषध घेताना तेथील मुलाने मला 'काका सुट्टे पैसे द्या' असे संबोधले तेव्हा मला पहिल्यांदा मोठे झाल्याची जाणीव झाली. तेव्हा जाणवले की आपली स्वत:ची ओळख इतरांकडून होते. आपल्यातील गुणांची, अवगुणांची जाणीव होत नाही. परंतु इतर व्यक्तींबरोबर व्यवहार किंवा चर्चा झाल्यानंतर कळते, आपण कसे आहोत? मनुष्य आपल्या कर्माने व चारित्र्याने श्रेष्ठ ठरु शकतो त्याला कोणत्याही मुखवट्याची गरज नाही.

प्रत्येकाच्या जीवनात काही घटना घडतात. प्रसंग येतात. त्यातून काही अनुभव पदरी पडतात. काही अनुभव खूप चांगले तर काही अनुभव खूपच वाईट असतात. अशा अनुभवातून काही शिकायचे असते. जीवनात प्रत्येकाला सुख, समाधान हवे असते. पण मायेची भुरळ सत्यापर्यंत नेत नाही. हे विश्व अज्ञानाने झाकले आहे. क्षणाक्षणाला येथे काही घटना, प्रसंग घडतात. अशा प्रसंगांना, घटनेला आपण सामोरे जातो. आपली इच्छाशक्ती पणाला लावतो, आपली चूक असेल तरी ती मान्य करत नाही म्हणून मग पुढे भांडण-तंटा उद्‌भवतो. अशा वेळी जी व्यक्ती माघार घेते, नम्र बनते, चूक कबूल करते, तीच व्यक्ती जिंकते असा अनुभव आहे, म्हणजेच नम्र माणसं नेहमी विजयी होतात हे सिध्द होते.

रस्त्यावर लाखो रुपये मोजून खरेदी केलेल्या गाड्या उभ्या आहेत पण इच्छा असूनही पुढे जावू शकत नाहीत वाहतुकीचे नियम मोडता येत नाहीत म्हणून वाट बघणे, हा पर्याय त्यांच्याकडे शिल्लक राहतो. पण या गर्दीतून वाट काढत एखादी सायकल, स्कूटर सहज पुढे जावू शकते, कारण ती छोटी आहे म्हणून!

आपण बाजारात जातो. वाण्याच्या दुकानात वजन काटा ठेवलेला असतो. त्या काट्याच्या बाजूला मोठमोठी वजनं ठेवलेली असतात. २० किलो वजनावर १० किलो ,१० किलो वजनावर ५ किलो, ५ किलो वजनावर २ किलो, असे करत करत सर्वात वर ५० ग्रॅमचं वजन ठेवलेलं असतं. २० किलो वजनाचं माप मोठं असल्यानं खाली जमिनीवर ठेवलेलं असतं. तर सगळ्यात छोटं माप ५० ग्रॅम सगळ्यात वर ठेवलेलं असतं. लहान असल्यामुळे अगदी शिखरावर बसण्याचा मान मिळतो. लहान असल्याचा असाही फायदा होतोच.

घरातही सगळ्यात लहान मुलाचे जास्त लाड करतात. त्याच मुलाकडे सगळ्यांचे लक्ष असते कारण ते त्या घरात सगळ्यात लहान असतं, लहान असल्यामुळे सगळ्यांचं लक्ष असतं म्हणून त्याचा विकासही चांगल्या प्रकारे होतो.

हाताच्या पंजामध्ये ५ बोटं आहेत. प्रत्येक बोट महात्वाचं आहे. आंगठा ते करंगळी सगळी बोटं महत्वाची; परंतु सगळ्यात 'छोटी' करंगळी असल्याने तिच्यावर नेहमी भार असतो म्हणून करंगळीला सहनशक्तीची उपमा देतात.

पुरात, वादळात, मोठमोठी झाडे मुळासकट वाहून जातात. तेथे गवत अगदी आनंदाने डोलत असते. लहान असणे नेहमीच फायद्याचे असते. शरीराने, उंचीने, नव्हे तर चंचल मनामध्ये लहान बनण्याचा, नम्र बनण्याचा भाव जागृत करणं गरजेचं आहे. जीवनाच्या खडतर प्रवासात खूपच विक्षिप्त, विचित्र माणसं भेटतात, त्यांचं वागणं बोलणं मनात चीड निर्माण करणारं असतं. त्यांचे व्यवहारही चांगले नसतात. मग अशा व्यक्तींशी संभाषण होतंच. त्या व्यक्तींचा स्वभाव आपल्याला आवडत नाही. कारण आमचा स्वभाव तसा नसतो म्हणून आम्हाला त्यांचा राग येतो. परंतु मनात नम्रता असेल, क्षमा करण्याची वृत्ती असेल, तर मग सगळंच

गोड होतं. सतत शिव्याशाप देणारी व्यक्तीही मग अदबीने वागते, नम्रता व स्मितहास्य हे वज्रापेक्षाही कठीण शस्त्र आहेत यात शंका नाही. म्हणूनच संत तुकाराम महाराज म्हणतात.

लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा
ऐरावत रत्न थोर तया अंकुशाचा मार
जया अंगी मोठेपण, तया यातणा कठीण
तुका म्हणे जाण व्हावे लहानाहूनी लहान।।

या छोट्याशा अंभगातच लहान बनण्याची थोरवी सांगितली आहे. नम्र बनूनच यशाची शिखरे चढता येतात. शिखरावर चढणारा माणूस नेहमी झुकलेला असतो व शिखरावरुन खाली उतरणारा नेहमी ताठ असतो सर्वप्राणिमात्रातही सगळे प्राणी आडवे आहेत मनुष्ययोनी फक्त उभी आहे त्याला नम्र होण्याची गरज आहे.

आज समयाचे सद्गुरु संपूर्ण मानवमात्राला जीवन जगण्याची कला शिकवित आहेत. एका प्रभूपरमात्म्याशी जोडत आहेत. योग्य दिशा व मार्गदर्शन करीत आहेत. सत्य मार्गावर चालण्यास सांगत आहेत ब्रह्मज्ञानाची प्राप्ती करणं गरजेचं आहे, कारण अनमोल जीवनाला ज्ञानाची जोड मिळाली तरच खऱ्या अर्थानं जीवनात प्रेम, नम्रता येईल आणि जीवनाचं सार्थक होईल.

❁❁❁

आम्ही भाग्यवंत

गुरु हरदेवाच्या चरणी आलो आम्ही भाग्यवंत
जागविती पदोपदी आम्हा हे सारे संत ।।धृ।।

ब्रह्मज्ञान दिधले आम्हा मानवप्राण्याला
कर्मासंगे भक्ती दिधली मुक्ती साधण्याला
दैन्य दुःख दूर करी असा कृपावंत ।।१।।

शिळा अहिल्या उध्दरीली तेत्रा युगात
प्रभुराम पदस्पर्शाने झाली ती पुनीत
असा सद्गुरु हा माझा आहे गुणवंत ।।२।।

चराचरामध्ये आहे प्रभुचे या स्थान
'कालिदास' त्यागून देई तुझा अभिमान
अंगसंग पाहे सदा रुप हे अनंत ।।३।।

- कालिदास परब
सिंधुदूर्ग-कणकवली

मासिक पत्र-पत्रिकांच्या सर्व सभासदांस महत्त्वाची सूचना

सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने संत निरंकारी व हसती दुनिया मासिक पत्रिका तसेच एक नजर पाक्षिक पोष्टाद्वारे आपल्यापर्यंत पोचवण्याचा पत्रिका विभागाद्वारे सातत्याने प्रयत्न केला जात आहे.

परंतु अलीकडच्या काळात असे निदर्शनास आले आहे की, पत्रिका विभागाद्वारे सदर पत्रिका ठरलेल्या तारखांनुसार न चुकता जी.पी.ओ. (जनरल पोस्ट ऑफिस, मुंबई) येथून पोस्ट करुनही सभासदांपर्यंत उशिरा पोचतात किंवा पोचतच नाहीत. अशा आशयाच्या अनेक तक्रारीही आमच्यापर्यंत येत आहेत.

सभासदांना सूचित करण्यात येते की, पत्रिका विभागाद्वारे पोस्ट करण्यात येणाऱ्या पत्रिका संगणकीय यादीनुसार पोस्ट होत असल्यामुळे प्रत्येक सभासदाच्या नावाने प्रत्येक महिन्याला पत्रिका पोस्ट केल्या जातात. तरीही जर पत्रिका आपल्यापर्यंत पोचत नसतील तर तो निश्चितपणे पोस्टाचा आणि पोस्टमनचा वैयक्तिक दोष असू शकतो.

ही बाब ध्यानात घेऊन या ना त्या मार्गाने पत्रिका आपल्यापर्यंत पोचाव्यात या दृष्टिकोनातून मराठी पत्रिका विभागाने प्रायोगिक तत्त्वावर आणखी एक पाऊल उचलण्याचे ठरवले आहे. त्या अनुषंगाने ज्या महापुरुषांना पत्रिका पोचत नाहीत फक्त अशाच महापुरुषांनी ज्या नावाने पत्रिका सुरु आहेत त्या नावांची (तालुकावार किंवा जिल्हावार) यादी आपल्या मुखी-संयोजकांच्या सहीने पत्रिका विभाग (दादर) येथे पाठवावी व सोबत आपल्या विभागातील जवळच्या सत्संग भवनचा पूर्ण पत्ताही पाठवावा. जेणेकरुन त्या विभागातील महापुरुषांच्या पत्र-पत्रिका आपल्या स्थानिक सत्संग भवनच्या पत्त्यावर पोस्टाद्वारे किंवा वेळ पडल्यास कुरिअरद्वारे पाठविण्यात येतील.

संपादक

पुरे का हर काम पुरा

श्री. नितेश मधुकर पंडित
मु. तुरंबव, जि. रत्नागिरी

मानवाच्या जीवनाचे कल्याण व्हायचे असेल तर त्याच्या जीवनात पूर्ण सद्गुरु येणे आवश्यक आहे आणि आज आपण सर्व भाग्यवान आहोत की आपल्या जीवनात देखील अशा पूर्ण सद्गुरुचे आगमन झाले आहे आणि पूर्ण सद्गुरुची महती वर्णन करताना नेहमी म्हटलं जात की-

पुरे का हर काम पुरा

मात्र संत महात्मा सत्संगामध्ये म्हणतात की, आम्ही सर्व अपूर्ण आहोत . आमच्यात काही ना काही उणीवा आहेत. पूर्ण फक्त आमचा सदगुरु आहे. मग प्रश्न असा निर्माण होतो की जर वरील उक्तीप्रमाणे पुरे का हर काम पुरा असे आपण सद्गुरुला संबोधत असू तर पूर्ण सद्गुरुचे भक्तदेखील पूर्ण असावे लागतील, पण सत्संगामध्ये सर्वच महात्मा स्वत:ला अपूर्ण का समजतात ?

या प्रश्नाची उकल करताना अनेक गोष्टींचा विचार करावा लागेल.

सर्वप्रथम आम्ही सर्व अपूर्ण असून आमचा सद्गुरुच पूर्ण असे म्हणून सर्व संत महात्मा आपल्या समर्पित जीवनातून अहंकाराला दूर ठेवून व सद्गुरुला आपल्या जीवनात सर्वोच्च स्थान देऊन आपल्या विशाल हृदयाचे दर्शनच घडवत असतात, हे एक प्रकारचे पूर्णत्वाचे लक्षण आहे.

त्यानंतर दुसऱ्या गोष्टीचा विचार करणे गरजेचे आहे की, पूर्णत्व तर सद्गुरु बाबाजींनी ब्रह्मज्ञानासोबत आपल्याला बाहाल केले आहे; परंतु आपल्याला त्याची जाणीव नसते. ज्याप्रमाणे रामायणामध्ये सीतामातेचा शोध घेण्याकरिता हनुमंताने ज्यावेळी समुद्रावरुन उड्डाण केले, त्यापूर्वी स्वत: हनुमंतालादेखील आपल्या या अचाट (अर्पूव) शक्तीची कल्पना नव्हती. पण ज्यावेळी त्याच्यावर प्रभु रामचंद्रांची कृपा झाली त्यावेळी त्याला त्याची जाणीव झाली. त्याचप्रमाणे आपल्यालादेखील पूर्णत्वाची जाणीव होण्यासाठी सदगुरुच्या कृपेचीच आवश्यकता असते.

तसेच पूर्णत्वाबद्दलचा तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आपण पूर्णत्व प्राप्त करु शकतो. या गोष्टीचा पडलेला विसर आणि हा विसर आपल्याकडून अनेक बऱ्या वाईट गोष्टी करवून घेऊ शकतो व त्याची कारणमिमांसा करताना आपण सहज बोलून जातो की आपण कुठे पूर्ण आहोत ? चुका तर व्हायच्याच ! त्यामुळे आपण पूर्णत्वाच्या जाणिवेचा स्वीकार करुन सद्गुरुला समर्पित झाले पाहिजे आणि मग म्हटलं पाहिजे की आम्ही पूर्ण सद्गुरुचे भक्त आहोत, तेव्हाच आम्हाला सेवा, सत्संग, स्मरण करण्यासाठी एक सकारात्मक उर्जा प्राप्त होऊन भक्तीचा स्तर उंचावू शकतो आणि आमच्या नित्य कर्मात एक प्रकारचा आत्मविश्वास येऊन पूर्ण भक्ताचं जीवन आपण व्यतीत करु शकतो म्हणजेच पूर्ण सद्गुरुने शिकवलेली भक्ती अहंकार त्यागून समर्पित भावनेने केली तरी आपण पूर्णत्वाला प्राप्त करुन पूर्ण भक्त बनू शकतो. म्हणजेच 'पुरे का हर काम पुरा' या उक्तीलादेखील पूर्णत्व प्राप्त होऊ शकते.

सत्याची प्रसिध्दी करणारे बनुया

रावणाची नगरी ही राक्षसांची नगरी असुनही तिथे बिभीषण सारखे संत मिळतात. तर संतांच्या नगरीत दगा देणारेही अनेक दगाबाज भेटतात. विनम्रता अंगिकारुन संत सत्याचा प्रचार करण्यासाठी आपले तन, मन, धन अर्पण करतात हीच खरी संतांची ओळख आहे. दुष्टांच्या डोक्यावर शिंग आणि संतांच्या डोक्यावर मुकुट असतो असं काही नसतं. संतांची मनोवृत्ती नेहमी दयाळू आणि नम्रतेने परिपूर्ण असून शांती प्रस्थापित करणारी असते. परंतु दुष्ट प्रवृत्तीचे लोक सतत नाश करण्याचे कार्य करतात, नेहमी क्लेश निर्माण करतात.

आज माणसाने खऱ्या धर्माची ओळख बाजूला ठेवून आपण काही विशेष आहोत अशी स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. माणूस विचार करतो की, तीर्थस्नान करण्याने, विशेष प्रकारची वस्त्रे वापरण्याने, माळा जपल्याने लोक आपल्याला धर्मी म्हणतील. महापुरुष म्हणतात प्रेम नम्रता धारण करुन दुसऱ्याला सुखी करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणारेच खऱ्या अर्थाने धर्मी म्हणविण्याचे हक्कदार आहेत. त्यांनी हेच समजविले आहे की, संतांची वचनं आणि कर्म विनम्रतापूर्वक आचरणात आणून सर्वांनी सत्याची प्रसिध्दी करणारे बनुया.

- सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज

अंतरंगातून उठलेला अहोभाव आहे ..... प्रार्थना

सन्त निरंकारी, हिन्दी,
ऑगस्ट२०१२
श्री. महेश सक्सेना(शाहजहांपूर, उ.प्र.)

प्रार्थना हा अंतरंगातून उठलेला अहोभाव आहे. आपल्या मूळ परमतत्वाशी एकरुप होण्याची तरल उत्कंठा म्हणजे प्रार्थना! होण्याचा संबंध प्रभूशी (चैतन्य) आहे आणि करण्याचा संबंध प्रकृतीशी (जग) आहे. क्रिया तर प्राप्त न होणाऱ्या वस्तुसाठी असते. प्राप्त असणाऱ्या परमात्म्यासाठी क्रिया केल्यास परमात्म्यापासून दूर होऊन जाऊ. कारण प्रत्येक क्रियेचा आदि आणि अंत होत असतो, तर परमात्मा मात्र अनादि आणि अनंत आहे. म्हणून आदि आणि अंत असणाऱ्या कर्माबरोबर अनादि आणि अनंत परमात्मा कसा काय भेटणार?

आपण चुकून समजतो की, संसार तर प्राप्त आहे आणि परमात्मा , मात्र अप्राप्त आहे. सत्य तर हेच आहे की, परमात्मा कधीही अप्राप्त होऊ शकत नाही, परमात्म्याहून रहित (वर्जीत) कोणीही होऊ शकत नाही. जागा सर्वत्र रिकामीच- रिकामी दिसते. ती रिकामी तर आहेच, परमात्म्यापासून मात्र ती रिकामी नाहीच.

प्रार्थना तर सकाळपासून संध्याकाळपर्यंत चालतच असतात... आपापल्या नियमानुसार. परमात्मा कोणत्याही सिध्दान्त किंवा नियमाशी बांधलेला नाही, होय भावनेशी मात्र बांधलेला आहे, प्रार्थना पुजारी देखील करत आहे आणि त्याच्या शेजारी उभा असलेला पाच-सहा वर्षांचा एक लहान मुलगा हात जोडून उभा आहे... अगदी निष्कपट भावनेने. लहान मुलाला पाहून पुजारी म्हणाला, "तू काय करीत आहेस?" त्यावेळी लहान मुलाने उत्तर दिले, "तुम्ही जे करीत आहात तेच मी करत आहे" तेव्हा पुजारी म्हणाला, "अस्सं! मी तर प्रार्थना करत आहे. कितीतरी श्लोकांचं सुस्वर उच्चारण केलं आहे आणि तू जे करीत आहेस ती प्रार्थना होऊ शकते काय?"



मुलाने सांगितले की, 'मला फक्त बाराखडी येतेय. मी तिची वारंवार पुनरावृत्ती करतो आणि अखेर हेच म्हणतो की, हे प्रभु! मी पूर्ण बाराखडी योग्य रीतीने ऐकविली आहे. या बाराखडीतून जे आपणास योग्य वाटेल तीच प्रार्थना माझ्याकडून समजून घ्या.

पुजाऱ्याने केलेली प्रार्थना ही क्रिया आहे, तर त्या लहान मुलाने केलेली प्रार्थना ही प्रार्थना आहे. प्रभु परमात्म्याचा आधार घेऊन केलेले कर्मच प्रार्थना आहे. संपूर्ण अवतारवाणीतील पद क्र. २८५ याची साक्षी देत आहे.

तुझ्या आश्रये सर्व करितो मी काम।
स्वीकारी गुरु मम लाखो प्रणाम।
साकार तूची निराकार तूची।
गुरु वचन तू अन् अवतार तूची।
महिमा तुझा नाही कळला कुणाला।
तुजवीण कोणी न जाणीले तुजला।
स्वीकार करिशी जो येईल चरणी।
कुळ ग्राम याती मनाशी न आणी।
शरणी मी आलो असे आज तुजला।
घडवियला तूच अवतार मजला।

ख्रिस्ताचं कथन माझ्या 'साम्राज्यात मुलंच प्रवेश करतील' चा आशय जोपर्यंत मुलांसारखे होणार नाही, प्राथमिक सरळता करणार नाही तोपर्यंत प्रार्थना कुठे आहे?

प्रार्थना में शक्ति है ऐसी,
कि वह निष्फल नहीं जाती।
जो अगोचर कर चलाते है जगत को,
उन करों को प्रार्थना नीरव चलाती।

द्वापार युगातच बासरी वाजली नाही, तर आजही वाजत आहे आणि ऐकली नसेल तर त्याला आम्हीच जबाबदार आहोत. आमच्याही प्रार्थना परमात्म्याने ऐकल्या

(पान २६ वर)

समदृष्टीतून सुंदर सृष्टीचे दर्शन

श्री.'बापू' श्रीकृष्णदास निरंकारी
राम नगर, गडचिरोली

जसं म्हटलंय की 'जशी दृष्टी तशी सृष्टी' ते अगदी सत्य आहे. येथे दृष्टीचा संबंध केवळ चर्मचक्षूशीच नसून आंतरिक भाव-भावनांशी आहे. समदृष्टीचा शब्दशः अर्थ सर्वांना समान मानणे असा करता येईल. जगनिर्मात्याने तर रंगीबेरंगी, सुंदर व मनोहर अशीच सृष्टी निर्माण केली आहे. परंतु मानव आपल्या नितीमूल्यांना डावलून आपल्या पदरी नैराश्य व अपयश पाडून घेतो. आपल्या आचार-विचारांना नकारात्मक रुप देत 'सृष्टी एक नरक आहे' असे बरळून जातो. थोर पुरुष, साधू-संत व प्रज्ञावंत वारंवार, पदोपदी मानवाला सावध करतच असतात. वृक्ष-वेली, पशू-पक्षी व नर-नारी यासर्वांमध्ये परमेश्वराचे एकच दिव्य तत्त्व(अंश) विराजमान आहे. त्या सर्वांशी सकारात्मक भावनेने किंवा समदृष्टीने व्यवहार केल्यास हीच सृष्टी स्वर्गमय भासू लागेल, असे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज काव्यशैलीतून मांडतात-

सर्वाशी समत्वाकडे न्यावे।
एकत्व व्यवहारी नांदवावे।।
अवघे विश्वची ब्रह्मसुखी डोलावे।
वाटे तया संता।।७५।।

ग्रामगीता- अध्याय ३२वा

वेळोवेळी कठीण प्रसंगी निराकार ईश्वराचे जे साकार रुपात अवतरण झाले, त्यात गुरु, वली, पीर, पैगंबर, प्रेषित किंवा तीर्थंकर या सर्वांनी सृष्टीला नंदनवनासमान आल्हाददायक बनविले. त्यांनी आपल्या पश्चात मानवासाठी मार्गदर्शक सूत्रे व नियम हे शास्त्ररुपाने लिहूनही ठेवले.माणूस वाचन, पठन, पाठन व्याख्यानसुध्दा करतो; परंतु वागताना मात्र माणुसकी विसरुन मनमानी करतो. क्षुद्र जीव-जंतू व इतर जैविक-अजैविक या सर्वांचा उपभोक्ता समजून त्यांच्यावर अत्याचार करतो; सदाचार पाळत नाही. त्यामुळे भूकंप, त्सुनामी, अवर्षण, पर्यावरणाचा समतोल बिघडणे, ग्लोबल वार्मिंग, या सारख्या नैसर्गिक व मानवनिर्मित प्रलयंकारी संकटांना जणू काही निमंत्रण मिळते, सांप्रत विज्ञानयुगी समदृष्टीची भावना विसरणाऱ्या स्वार्थी मानवाला जागृत करण्यासाठी युगपुरुष बाबा अवतारसिंहजी महाराज समान दृष्टीक्षेपाचे वर्णन करतांना म्हणतात-

पुरन गुरु की दृष्टी में तो, सब नर ही है एक समान ।
पुरन गुरु की दृष्टी में तो, एक जैसे है सब ही इन्सान ।

अवतार वाणी पद क्र.८०

संतांनी सांगितलेली त्रिसूत्री 'ज्ञान-कर्म-भक्ती' ही सर्वसामान्य माणसाच्या अंगवळणी पडत नाही, तोवर त्याला माया ब्रह्म म्हणजे काय? या प्रश्नांची उकल होणार नाही. पर्यायाने प्रेम, नम्रता, सहनशीलता, दया, क्षमा, बंधुभाव इत्यादी दिव्य गुणांची रुजवण त्याच्याठाई होणे शक्य नाही. अशा सदगुणांची ज्या हृदयात कमतरता आहे, तेथे समदृष्टीसारखा पूज्यभाव सुध्दा दुरापास्तच समजावा; पण ब्रह्मज्ञानी भक्ताच्या रोमारोमातून, काया-वाचा-मनादिकातून समदृष्टीचे दर्शन घडते. याचे यशोचित वर्णन भगवान श्रीकृष्ण करतात-

विद्याविनयसम्पन्ने, ब्राह्मणे गवि हास्तिनि।
शुनिचैवश्वपाके च, पण्डिताः समदर्शिनाः।।१८।।

भगवदगीताः संन्यास योगः अध्याय ५ वा

(ज्ञानी भक्त विद्या व विनय यांनी संपन्न असलेला ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा व चांडाळ या सर्वांकडे समदृष्टीने पाहतात व तद्रुप व्यवहार करतात.)

भगवान श्रीकृष्णाने सर्व सवंगडी तसेच कौरव व पांडव या सर्वांवर समदृष्टी ठेवली होती; परंतु कौरवांना त्यांच्या आतताई, स्वार्थी आणि कुटील प्रवृत्तीमुळे विनाश ओढवून घ्यावा लागला. अवतारी पुरुषांच्या दृष्टिकोनात गरीब वा श्रीमंत, कनिष्ठ वा श्रेष्ठ, नारी वा नर, स्पृश्यास्पृश्य अथवा आपला वा परका असा कोणीही नसतो. भगवान प्रभू श्रीरामचंद्रांनी शबरीची उष्टी बोरे आनंदाने खाल्ली व तिला बोधामृत पाजून तिच्या नरजन्माचे कल्याण केले. ब्रह्मज्ञानावर

भक्तांत वर्तनबदल दिसून येत असल्याचे भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात-

"यदृच्छलाभसंतुष्टो द्वन्द्वातीतो विमत्सरः।
समःसिध्दावसिध्दौच कृत्वापि न निबध्यते।।२२।।

भगवदगीता : ज्ञानकर्मसंन्यास योगःअध्याय ४था

(सहजपणे जे मिळेल त्यात संतुष्ट, सुखदुःखादी द्वंद्वांपासून अलिप्त, मत्सर रहित, यशापयशाविषयी समदृष्टी ठेवणारा भक्त कर्मे करुनही बध्द होत नाही.)

जैववैविध्याने नटलेल्या भूतलावर प्रत्येक जीव व मानवमात्रांत एक समान 'आत्मा' विराजमान असतो हे संत-सज्जनांनी स्वतःच्या कृतीद्वारे शिकविले आहे. संत एकनाथ महाराजांनी काशीतीर्थावरुन आणलेले जे गंगोदक तहानेने तडफडणाऱ्या गाढवाला पाजून त्याचे प्राण वाचविले. संत नामदेवांच्या शिदोरीतील पोळ्या कुत्र्याने पळविल्या तेव्हा 'सर्वांभूति परमेश्वर' पाहणारे संत नामदेव महाराज तुपाची वाटी घेऊन त्याच्या मागेमागे फिरु लागले होते. ते स्वतः शिंपी होते. कसल्याही प्रकारचा भेदभाव न ठेवता लोकांचे कपडे शिवून देत असत; असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रंथात लिहिले आहे -

हाती घेवोनि तूपवाटि । नामदेव लागे श्वानापाठी ।।
संतोषवि जगी जगजेठी । कपडे शिवोनी ।।३०।।

सृष्टीतील प्रत्येक चराचर समदृष्टीच्याच भावनेद्वारे कार्यरत आहे. ब्रह्मांडातील नऊ मायांमधील सूर्याचा विचार केल्यास तो संपूर्ण चराचरांना समान उष्णता देतो. भूमाता ही सर्वांना आश्रय देते. वनस्पतींचा विचार केल्यास वृक्ष सर्व जीवांना समान शीतल छाया देतात, फुले व फळेही देतात. नदी सर्वांची तृष्णा भागविते. इत्यादी अनेक उदाहरणातून असे दिसून येते की, निसर्गातील प्रत्येक वस्तूंमार्फत समदृष्टी ही नित्यनेमाने पाळली जात आहे. परंतु सृष्टीतील 'बुध्दिमान राजा' समजण्यात येणारा मानव मात्र समदृष्टीपासून कोसो दूर भरकटत चालला आहे. त्याने संतचरणी शरण येऊन आपली विपरित दृष्टी ही समदृष्टीत परावर्तित केली तर सुंदर स्वर्गमयी सृष्टी घडल्याखेरीज कशी राहिल? संतातील समदृष्टीचे महात्म्य बाबा अवतारसिंहजी सांगतात-

धिरज, संयम और समदृष्टी, सन्त जनों का गहना है।
सन्तों का श्रृंगार सदा का, हरि इच्छा में रहना है।

अवतारवाणी पद क्र. २८

❁❁❁

अंतरंगातून उठलेला अहोभाव ...

(पान २४ वरुन)

म्हणून तर सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी उत्तर प्रदेशात मानव कल्याण यात्रेत लखीमपुर, पीलीभीत, बरेली, बदायुं इत्यादी ठिकाणी दर्शन देऊन कृतार्थ केले, आपल्या अमृतवाणीने आणि सहजगत्या स्मितहास्याने तृप्त केले. दासला ही प्रार्थना करण्याची संधी लखीमपुर समागमात मिळाली. त्या ओळी धन्य झाल्या ज्या ऐकून सद्गुरु बाबाजींच्या स्मितहास्यासह पंडालमध्ये हास्याची लाटच फुलून आली...

प्रेम जब अनन्त हो गया, रोम-रोम सन्त हो गया।
आप ने जो मुस्कुरा दिया, आगमन बसंत हो गया।
आप को पुकार भर लिया, शब्द-शब्द मंत्र हो गया।
सदगुरु के ज्ञान दान से, मोह से स्वतंत्र हो गया।

परमात्म्याकडे चालणारा प्रत्येकाचा आदरणीय मित्र होतो, कारण परमात्म्यात आत्मियता असते आणि संसारात ममता असते.

तर गोष्ट जेथून सुरु केली होती की, प्रार्थना हा अंतरंगातून उठलेला अहोभाव आहे... हजरत मुसा जंगलातून चालले होते. एक मेंढपाळ काही तरी बडबडत असल्याचं त्यांना दिसलं. हजरत मुसा थांबले आणि ऐकू लागले. मेंढपाळ म्हणत होता, "मी मेंढपाळ एकटाच आणि तू सुध्दा एकटाच. जर तू मला भेटलास, तर तुझ्या केसातून मी एक-एक ऊ काढून टाकेन. शरीर रगडून स्वच्छ करीन, कारण आयुष्यभर मी मेंढयांची सेवा केली आहे."

हजरत मुसा म्हणाले की, ही काय प्रार्थना झाली. परमात्म्याच्या केसांमध्ये ऊवा? मेंढपाळ म्हणाला, "प्रार्थनेचं ज्ञान नाही. मी आयुष्यभर जे काही केलं तेच माझ्याजवळ आहे." हजरत मुसाने त्याला ज्ञान दिले आणि म्हणाले की, यापुढे सांगितलेलीच प्रार्थना करत जा. इतकं सांगून हजरत मुसा पुढची वाटचाल करु लागले. काही अंतर पार होतेय तोच आकाशवाणी झाली, "हे काय केलसं मुसा? माझ्या भक्ताला माझ्यापासून वेगळं केलसं." प्रार्थना बाह्य देखावा आणि अवडंबराच्या पलीकडे आहे, अंतरंगातून उठलेला अहोभाव आहे. मेंढपाळाच्या प्रार्थनेला कमी करुन अनुमान करणे चूक होईल.

❁❁❁

प्रेमरुप भक्ती

श्री. नितिन लक्ष्मण घुरुप
मु.पो.हरकोल कोंड,
माणगाव, रायगड.

सामान्यतः मनुष्य आपल्या जीवनात विविध प्रकारे नाना साधनांद्वारे भक्ती करुन परमेश्वराला आपलसं करण्याचा प्रयत्न करत असतो. ही भक्ती मनात स्वार्थ भावना बाळगून, सापेक्ष, सहेतुक कार्यकारणांनी युक्त असते. अल्पावधित परमेश्वराला वश करुन भौतिक वा आत्मिक सुख मिळवण्याचा हेतू मनुष्याच्या अंतर्मनात लपलेला असतो. परंतु परमेश्वराविषयी प्रेम, भक्तिभाव व श्रध्दा यांचा अभाव असल्याने मनुष्याला त्याचे लक्ष्य प्राप्त होत नाही. पुरातन काळापासून संत महापुरुष, ऋषी, पीर, पैगंबर अशा विभूतींनी मनुष्याला ग्रंथ, शास्त्र, वेद, पुराण, अभंगाद्वारे भक्तिचे महात्म्य समजावण्याचा प्रयत्न केला आहे.

भक्ती म्हणजे परमेश्वरावरील निरिच्छित प्रेम! भक्ती म्हणजे सहजावस्था, समर्पित भाव. भक्ती ही हेतुप्रेरित नसते. भक्ती ही शाश्वत आहे, परमसत्याच्या सेवाप्रित्यर्थ हे प्रत्यक्ष कर्म आहे. भक्तिचे रुपांतर अद्वैतात म्हणजे ब्रह्मस्थितीच होते. भक्तिचे आकर्षण असे आहे की, ते भगवंतालाही खेचते आणि न घडे ते घडते असा अनुभव येतो. प्रभू रामचंद्राने भक्ती प्रेमापोटी भिल्लिणीची उष्टी बोरे चाखली. भक्तिप्रेमापायी विठ्ठलाला संत नामदेवांच्याबरोबर प्रत्यक्ष भोजन करावे लागले. आई वडिलांच्या प्रेममयी सेवेत मग्न असलेल्या भक्त पुंडलिकाला दर्शन देण्यासाठी पांडुरंगाला यावे लागले. अशी अनेक समर्पक उदाहरणे देता येतील ज्यांनी प्रेमरुपी भक्तीचा आधार घेऊन जन्म सार्थक केला.

परमेश्वराचे सर्वांवर प्रेम असते. त्याचे आपल्यावर प्रेम आहे म्हणूनच आपले जीवन आपण जगत असतो. त्याचे प्रेम ज्याक्षणी संपते त्याच क्षणी आपल्या जीवनालाही काही अर्थ उरत नाही. त्याचे प्रेम आपण ओळखायला हवे. त्याच्या प्रेमाच्या वर्षावाखाली आपण सतत स्नान करीत असतो, ह्याचे विस्मरण होता कामा नये.

सकल सृष्टीवर भगवंताचे प्रेम आहे ही वस्तुस्थिती आहे. पण सर्वांनाच ओळखता येत नाही. ती शक्ती फक्त माणूसच ओळखू शकतो. पण माणूस तिच्याकडे दुर्लक्ष करतो, ही गोष्ट माणसासारख्या विवेकी प्राण्याला न शोभणारी आहे. भगवंताचे आपल्यावर निरपेक्ष प्रेम असते, त्या प्रेमात व्यापार नसतो, मागणी नसते, अपेक्षा नसते. फायद्याची अथवा स्वार्थाची दृष्टी नसते. विशुध्द, पवित्र व वांच्छनिय असे प्रेम असते.

आपले मात्र भगवंतावर असलेले प्रेम हे आशा, आकांक्षा, अपेक्षा, स्वार्थ ह्यांच्या पूर्तीसाठी असते. त्यामुळे ते विशुध्द नसते. त्यामुळे अशा प्रेमाला सुगंध नसतो. त्याला स्वाद नसतो. याचना किंवा मागणी ह्यांच्यासाठी आपण भगवंतावर जे प्रेम करतो त्याने भगवंताला आनंद होत नाही. भगवंत संतुष्ट आणि तृप्त होत नाही. अर्थात असे असले तरी मातृहृदयी असलेला भगवंत आपण केलेल्या इच्छांपैकी काहींची यथासंभव पूर्तीही करतो. ही पूर्ती भगवंताच्या अंतःकरणाला साजेशी असते. त्याच्या स्वभावाला पोषक अशीच असते.

साधुसंत भगवंताच्या प्रेमाची गोडी चाखतात. त्याच्या आस्वादाने तृप्त होतात व स्वतःच्या जीवनात एक आगळा सुगंध आणतात. त्यामुळे भगवंताला अशी माणसे विशेष आवडतात. त्यांच्यावर भगवंताचे खरेखुरे प्रेम असते.

"मद्भक्तः समे प्रियः" प्रेम करणाऱ्या व्यक्ती मला आवडतात. श्रीकृष्णाने असा स्पष्ट अभिप्राय व्यक्त केलेला आहे.

ज्यांनी भगवंताचा आपल्या अंतःकरणात सतत वाहणारा प्रेमप्रवाह ओळखला, जाणला ते खरोखर धन्य होत. त्यांनी मानवी जीवन कृतार्थ केले असे निश्चितपणे म्हणायला हरकत नाही. द्रौपदी ही अशा भाग्यवंतापैकी एक व्यक्ती होती. तिला पांडवांसारखे कर्तृत्वसंपन्न आवडते असे पती मिळाले. कृष्णाचा हवाहवासा वाटणारा सहवास मिळाला एवढेच नव्हे तर खरेखुरे प्रेमही मिळाले. या प्रेमाचा तिच्या इतर नातेवाईकांना व मैत्रिणींना हेवाही वाटत असे.

एकदा सत्यभामाने श्रीकृष्णाला विचारले की, मी तुमची आवडती पट्टराणी, शिवाय माझ्यावर तुमचे अतिशय प्रेम आहे. तुमच्या आज्ञेबाहेर गेलेली नाही. तरी माझ्यापेक्षा द्रौपदीवर तुमचे अधिक प्रेम आहे त्याचे कारण काय ? तेव्हा श्रीकृष्णाने सांगितले की याचे उत्तर योग्य वेळेला देईन.

सत्यभामाच्या प्रश्नाचे समर्पक उत्तर देण्याची श्रीकृष्ण वाट पाहतच होता. सुदैवाने तसा एक प्रसंग घडला. वसंत ऋतुत आम्रफळांचा हंगाम असल्याने कृष्णाने आंबा खाण्याची इच्छा व्यक्त केली. धारदार चाकूने आंबा कापताना त्याचे बोट कापले. भळाभळा रक्त वाहू लागल्याने सगळ्यांची धावपळ झाली. सत्यभामा धावत धावत आली आणि बोटाकडे पाहून म्हणाली, अगं बाई! काय रक्त वहातय ? दासींनो, धावा पळा बोट बांधायला चिंधी आणा... शालू मिळेल पण चिंधी मिळणे कठीण. सत्यभामा व दासी हैराण. तितक्यात ही गोष्ट द्रौपदीच्या कानावर पडताच सारी कामे टाकून ती तिथे हजर झाली. बोटातून भळाभळा वाहणारे रक्त पाहून कसलाही विचार न करता आपल्या भरजरी शालूची लांबलचक पट्टी टर्रर्रर्र दिशी फाडली व बोटाला बांधली. सत्यभामा तिथे होती. आता सत्यभामेच्या सारे ध्यानात आले.

भक्तीचा आव आणून, सोंगे करुन भगवंताला वश करता येत नाही. परमेश्वर कुठल्याही कर्मकांडाने प्रसन्न होत नाही तर तो भावाचा भुकेला असतो. शहनशाह बाबा अवतारसिंहजी म्हणतात-

वश ना होई कधी भगवंत केवळ जय जयकाराने ।
वश ना होई कधी भगवंत घंटांच्या निनादाने ।
वश ना होई कधी भगवंत चिमट्यांच्या झणकाराने ।
वश ना होई कधी भगवंत तार स्वरे आळविण्याने ।
वश ना होई कधी भगवंत धूप मंदिरी जाळीता ।
वश ना होई कधी भगवंत लाख अर्पण करीता ।
वश ना होई कधी भगवंत अखंड दीप जाळूनी ।
वश ना होई कधी भगवंत शक्ती आपुली खर्चूनी ।
म्हणे अवतार गुरुच्या चरणी शीर झुकविणे भाग असे ।
(सं. अ. प. क्र. १४२)

म्हणून परमेश्वरप्राप्ती करिता मनात परमेश्वराविषयी प्रेम असणे आवश्यक आहे. पूर्ण सद्गुरुला शरण जाणे गरजेचे आहे. शहनशाह बाबा अवतारसिंहजी म्हणतात-

मना अंतरी नसतां प्रीती राम भेटणे नाही तुला ।
(सं. अ. प. क्र. १६०)

समर्थ रामदास स्वामी श्लोकात लिहितात,

सदा सर्वदा प्रीती रामी धरावी ।
दुःखाची स्वयें सांडी जीवी करावी ।
देहेदुःख ते सूख मानीत जावे ।
विवेके सदा स्वस्वरुपी भरावे ।
(श्लोक क्र.१०)

भक्तीमार्गावरुन वाटचाल करणाऱ्या साधकाला समर्थ रामदास सांगतात, पाप आणि दुःखाचे मूळ असणाऱ्या स्वार्थी बुध्दिचा त्याग करुन हे मना, देहावर प्रेम न करता परमेश्वरावर प्रेम कर. तेव्हा दुःखाचे निवारण होईल. प्रत्येक मानवमात्राच्या अंतरात्म्याला ओळखून त्याच्यावर निस्वार्थ, निर्हेतुक प्रेम केल्याने आनंदाचे झरे भरुन वाहतील.

म्हणून समयाचे सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज ब्रह्मज्ञानाद्वारे निराकाराचा बोध करुन परमात्म्याला आपलसं करुन देत आहेत. परमात्मा सृष्टीतील प्रत्येक गोष्टीत स्थित आहे, आपलसं करण्यासाठी सृष्टीतील प्रत्येक जीवावर प्रेम करणे आवश्यक आहे.कारण तेच खरे परमेश्वराचे प्रत्यक्ष अन् अप्रत्यक्ष रुप आहे. म्हणून शहनशाह बाबा अवतारसिंहजी म्हणतात-

परमात्माचे रुप जाणूनी सर्वांसंगे प्रेम करी ।
चराचरातील कणा कणातून दर्शन भगवंताचे करी ।
(सं. अ. प. क्र. ३१०)

एक देव आहे खरा

श्री. सिताराम कोळेकर
बाजारपेठ राजापूर, रत्नागिरी

या जगातील प्रत्येकजण जेव्हा आपल्या धर्माची शिकवण मानायला लागेल, आपल्या गुरु-पीर- पैगंबरांच्या शिकवणीचा अंगीकार करायला लागेल तेव्हा कोणतेही मतभेद होऊ शकणार नाहीत. आणि असं झालं तर कोणाच्याही हाती घृणेचा खंजीर असणार नाही. मानवी देह रक्ताच्या थारोळ्यात पडणार नाहीत. स्त्रियांवर अत्याचार होणार नाहीत. परंतु जगाच्या पाठीवर हजारो सांप्रदायिक पंथ असूनही मानव मात्र मानवाचाच वैरी होतोय. प्रेमाच्या जागी द्वेष, मत्सरच ओकतोय. याचं कारण म्हणजे केवळ अज्ञान.

आज मनुष्य विज्ञान युगात वावरत असताना अज्ञान कुठलं आलं? थोडासा विचार केल्यास लक्षात येते की आपला कोणताही धर्म असेल, आपली कोणतीही भाषा असेल, आपण कोणत्यातरी दैवताचे उपासक असाल, आपली पूजा करण्याची विशिष्ट पध्दत असेल, आपली एखादी संस्कृती असेल, आपण श्रीमंत असाल, डॉक्टर किंवा वकील असाल, एखाद्या मोठ्या देशाचे रहिवाशी असाल. हे सर्व आपल्या जवळ असले, या सर्वांशी आपण संबंधीत असलो तरी आधी आपण कोण आहोत, हेच मनुष्याला माहिती नाही आणि हेच माणसाचे खरे अज्ञान आहे आणि या अज्ञानामुळेच माणसामाणसात वैर, घृणा वाढलेली आहे, अशांती वाढली आहे. दुर्गुणांचा सुकाळ दिसत आहे. यासाठी माणसा-माणसात प्रेमभाव निर्माण झाला पाहिजे तर निरंकारी मिशनमार्फत संत जगाला ओरडून सांगताहेत की आधी आपण कोण आहोत हे जाणून घ्या.

निरंकारी मिशन कोणते काम करते, तर म्हटलंय-

सद्गुणोंका हो विकास यही हमारा प्रयास है ।

सद्गुणांचा विकास होऊन सर्वत्र शांती कशी प्रस्थापित होईल हे सांगताना सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज सांगतात.

अमन शांती यदि नये युग की माँग है तो इसका एकमात्र उपाय है आध्यात्मिक जागृती

अर्थात आध्यात्मिक जागृती म्हणजेच प्रत्येक माणसात ईश्वर आत्म्याच्या रुपाने स्थित आहे आणि तो एकच आहे ही समज येणे महत्त्वाचे आहे. निरंकारी मिशन Self

Realisation Though God Realisation निजस्वरुपाची ओळख करुन देते.

निरंकारी मिशन कोणाचीही जात बदलत नाही, धर्म, वर्ण, आहार, वेशभूषा, यात परिवर्तन करत नाही, तर विविधतेच्या पलिकडे जाऊन शाश्वत प्रभू परमात्म्याशी जोडून मानवी जीवन जगण्याची प्रेरणा देत आहे. म्हणून वर्तमान समयाचे सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज सर्व जगाला एक संदेश देत आहेत की या जगातील मानव एकाच परमपिता, परमात्म्याची लेकरे आहेत. यासाठी आपण ज्याची पूजा करतो, ज्याच्यावर आपली श्रध्दा आहे त्या देवाला अगोदर जाणून घ्या, त्याची ओळख करुन घ्या. केवळ निरंकारी बाबाजीच सांगतात असंच नाही तर वेद, पुराणंसुध्दा प्रमाण आहेत. मागील साधुसंतांनीसुध्दा ईश्वराला जाणून घेता येतं हे सांगितले. म्हणून म्हटले आहे.

जाणारे जाणा करा कल्याण, असे सांगती वेद पुराण

जरी त्या देवाला वेगवेगळ्या नावांनी संबोधले असेल पण तो आहे मात्र एकच हे सांगताना रामदास स्वामी म्हणतात,

एक देव आहे खरा, माया आटीला पसारा,
शरण जावे संतजना, सत्य मानावे निर्गुणा ।

असा जो एक देव आहे, एक परमात्मा आहे त्याची ओळख नसल्यामुळे तो वेगवेगळा भासला म्हणून रामदास स्वामी म्हणाले 'आधी देवाशी ओळखावे, मग अनन्य भावे भजावे। अखंड ध्यानची धरावे। सर्वोत्तमाचे।।' हा ईश्वर सर्व घटात आहे हे जाणून घेतल्यावर समजते. नाना रुपात नटलेला ईश्वर एकच आहे हे ज्यावेळी समजते त्यावेळी धर्मजातीचे झगडे सुध्दा मिटून जातात. अवतार वाणीचे शब्द पण तेच सांगतात-

एक प्रभुची रचना सारी देह एक जैसे असती
जातीपातीचे व्यर्थची झगडे लोक उगे का आचरती
(सं. अ. प. क्र. १४)

एकाचीच रचना असल्यामुळे प्रत्येकाचे शरीर पाच तत्त्वाचेच बनले आहे. प्रत्येकाला हात, पाय, नाक, कान, डोळे आणि तोंड वगैरे सर्व अवयव सारखेच आहेत. प्रत्येकात जिवात्मा हेच सहावे तत्त्व आहे. प्रत्येकाच्या रंगरुपात भेद असेल पण रचना मात्र सारखीच आहे. कबीरजींनी म्हटले आहे-

कबीर कुआ एक है, पानिहारी अनेक,
बर्तन सबके न्यारे, पाणी सबमे एक।

आणखी पुढे म्हटले आहे-

माटी एक अनेक भाँती कर साजी साजन हारै,
ना किछ पोच माटीके भांडे, ना किछ पोच कुम्हारे।

मातीची अनेक भांडी दिसत असली तरी माती मात्र एकच आहे. भांड्यांचे आकार वेगवेगळे बनवले असतील पण सर्व एकाच मातीपासून बनवलीत. आणि भांडी बनवणारा कुंभार सुध्दा एकच आहे. पवित्र अवतारवाणीच्या एका पदात म्हटले आहे-

एकच या जगताचा स्वामी समज मनाला एक दिली
झगडे संपवूनी सदगुरुने गोष्ट एक समजावली
(स. अ. प. क्र. २१५)

ज्याने या एकाचा आधार घेतला त्याचे जीवन उज्ज्वल बनले. त्याला श्रेष्ठत्त्व प्राप्त झाले. म्हणून बाबाजी सांगतात एकाला जाणा, एकाला माना आणि एक व्हा.

जसे गणितात आपण अनेक शून्ये लिहिली तरी त्याची किमंत शून्यच राहते; परंतु त्याच शून्याच्या आधी एक अंक लिहिला तर त्या शून्यांची किंमत अनेक पटीने वाढते. आमचं जीवन सुध्दा शून्यवतच होतं; परंतु गुरुकृपेने या परमात्म्याला जाणून घेतले. एका ईश्वराची ज्यावेळी प्राप्ती झाली त्यावेळी आमच्या जीवनाला किंमत आली. साक्षात ईश्वराचे दर्शन होताच संत ज्ञानेश्वरांचे शब्द आठवले -

"धन्य आज दिनु, वर्षे अमृताचा धनु"

वेळ आपल्या गतीनं जात आहे, त्याचं काहीच बिघडणार नाही. जर आपण त्याची कदर केली तर आमचं काही तरी बनेल. आम्ही कदर केली नाही तर आमचं काही तरी बिघडेल. वेळेचं काही बिघडत नाही आणि बनतही नाही.

- सद्गुरु बाबाजी

नामाची आवडी तोचि जाणा देव !

श्री. वसंत काशिराम दळवी
आजरे गांव, कल्याण, जिल्हा- ठाणे

मनुष्य कितीही उत्तम प्रवचन करणारा असला, तरी तो जर परमेश्वराच्या नामात रंगत नसेल, नामस्मरणाची आवड नसेल, किंवा त्याच्या संगतीत राहून इतरांना प्रेम मिळत नसेल, तर तो कदापि महात्मा म्हणून संबोधला जाणार नाही. बाबा अवतारसिंहजी महाराज म्हणतात, या जगतामध्ये तोच संत समजला जातो जो प्रभुच्या नामाशिवाय हरिनामाशिवाय क्षणभरसुध्दा विश्रांती घेत नाही. सदगुरुच्या भक्तांचा मोठा आधार असेल तर ते फक्त ईश्वराचे नाम! म्हणून ते उठता, बसता, खाता, पीता, हे सर्व व्यवहार करतांना गुरुनामावर विश्वास ठेवून आवडीने नाम घेतात.

संत तोच ज्यासी नामाविण आणिक नाही दूजे काम ।
तोची संत हरिनामाविण पळभर घेत नसे विश्राम ।
रात्रंदिन हे संत सर्वदा श्रीहरिचा महिमा गाती ।
नाम औषध पिऊन सारे रोग आपुले घालविती ।
नाम हरिचे हरिजनांचा केवळ एक आधार असे ।
उठता बसता खाता पीता गुरु नामावर प्रीत असे ।
संत हरिचे जगता माजी सर्वांशी प्रेमे राहती ।
अवतार गुरुला शरण येऊनी शुभ वदती शुभ आचरिती

(सं. अ. प. क्र. ४१)

परमेश्वराच्या प्राप्तीसाठी मानवाने संताच्या संगतीत राहाणे आवश्यक आहे. संताच्या कृपेने मानवाच्या हृदयात प्रभुनामाची आवड उत्पन्न होते व टिकूनही राहते. मानव मोठ्या आवडीने संसार करतो, प्रपंच करतो. जे जे पाहिजे ते आवडीने घेतो. एकूण क्षणिक सुखाची आवड फारच धरतो, नामाची आवड, निरंतर सुखाची आवड फारच कमी धरतो. म्हणून जीवनात दु:खी होतो, परमार्थ हा आवडीचा आहे, सवडीचा नाही. संत ज्ञानेश्वर माऊली हरिपाठात म्हणतात.

नामा परते तत्त्व नाही रे अन्यथा ।
वाया आणिक पंथा जाशी क्षणा ।।३।।

(माऊलीहत हरिपाठ अ.क्र.२६)

मानवाला भवसागर पार करण्याचे साधन कोणते असेल तर फक्त ईश्वराचे 'नाम'! परमेश्वराच्या नामाशिवाय इतर कोणते श्रेष्ठ तत्त्व (साधन) नाही. दुसरा मार्ग अवलंबल्यास वाया गेल्याशिवाय राहणार नाही. परमेश्वराचे नाम श्रेष्ठ असून ते श्रेष्ठत्वाकडे पोहचविते, भवसागर पार करण्याचे साधन बनते. परमेश्वराचे नाम आणि रुप एकच आहे. जसा परमात्मा अविनाशी तसे त्याचे नामही अविनाशी आहे. परमेश्वराचे काम साध्य आहे. ते समजण्यासाठी पूर्ण गुरुला शरण हे गेलेच पाहिजे. साधकाला प्रभुनामाची गोडी लागली तर मला काही मिळायला पाहिजे, ही भावना मनात उरत नाही. नाम घेणारा दास बनून राहतो. द्वैत संपते.

अविनाशी शाश्वत असणारे प्रभुचे नाम मानवाला ध्येयवादी बनविते, त्याचे जीवन कल्याणकारी बनविते. संसारिक आवड अधिक न ठेवता परमार्थिक आवड असणे गरजेचे आहे. परमात्मा प्रेमाचा भुकेला आहे. म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात. 'तुमचे जीवन सुखाचे, कल्याणकारी व्हावे असे वाटत असेल तर प्रभुचे नाम आवडीने घ्या ते घेतल्याने भगवंत सदा सर्वकाळ तुमच्याशी जोडला जाईल!' परमेश्वराचे नाम हे सोपे साधन आहे. परंतु त्यामध्ये, आवड महत्त्वाची आहे ते प्रेमाने घेणे आवश्यक आहे. असे सोपे साधन आवडीने घेतल्यास, तुमच्या घरी लाभच लाभ येईल. नाम घेण्यासाठी कष्ट करण्याची गरज नाही किंवा इतर सायास करण्याची गरज नाही. नाम घेण्यासाठी तप करण्याची आवश्यकता नाही. मात्र त्यामध्ये एक वर्म आहे. ते म्हणजे प्रभुचे नाम दृढ मनाने, निश्चयाने, आवडीने घेतले तरच हरि जोडला जातो. प्रभुनामासाठी धन(पैसा) खर्च करावे लागत नाही. फक्त नाम उच्चारताना हृदयात प्रेम असावे गोडवा

असावा. असे नाम घेतल्याने त्याला आनंद होतो व निरंतर जोडला जाऊन आपले सुख भक्तांना देतो.

यालागी आवडी म्हणा रामकृष्ण ।
जोडा नारायण सर्वकाळ ।।१।।
सोपे हे साधन लाभ येतो घरा ।
वाचेसी उच्चारा राम हरि ।।२।।
न लागी कष्ट नलगे सायास ।
करावा अभ्यास विठ्ठलाचा ।।३।।
नलगे तप तीर्थ करणें महादान ।
केल्या एक मन जोडं हरि ।।४।।
तुका म्हणे काही न वेचिंता धन ।
डोले नारायण नामासाठी ।।५।।

(संत तुकाराम गाथा अ.क्र. ३०४५)

संत एकनाथ महाराज आपल्या अंभगात म्हणतात हे मानवा! आवडीने हरिचे नामस्मरण केलेस, तर तुला कोणतीही चिंता राहणार नाही. तेव्हा तू कोणत्याही गोष्टीचे दु:ख करु नकोस.

आवडीने भावे हरिनाम घेसी ।
तुझी चिंता त्यासी सर्व आहे ।।१।।
नको खेद करुं कोणत्या गोष्टीचा ।
पती लक्ष्मीचा जाणतसे ।।२।।

(नाथ महाराज)

मानवाने आवडीने प्रभुनाम घेतल्यास त्याला मोठा यज्ञ केल्याचे पुण्य लाभते, प्रभुचे नामस्मरण यज्ञ आहे. तो यज्ञ होतअसताना त्याला कोणते बंधन नाही, स्नान केलेच पाहिजे नंतरच नामस्मरण करावे असे नाही. नाम वेदांपेक्षाही परमोच्च आहे असे भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, त्याचे वर्णन माऊली ज्ञानेश्वरीत करतात.

नामजप यज्ञु तो परम। बांधू न शके स्नानादिकर्म।
नामे पावन धर्मा धर्म नामपरब्रह्म वेदार्थ ।।२३३।।

(ज्ञानेश्वरी अ. १०वा)

संत नामदेव महाराज सुध्दा आपल्या अभंगात त्यांना जी गुरुकृपेने जाणीव झाली, ती सांगतात. ते म्हणतात प्रभुचे नाम एवढे विशाल आहे की, त्याचे मोजमाप करता येत नाही. ते आकाश, पाताळ, असे सर्वत्र नांदत आहे. तसेच सर्वत्र भूमंडळावर (पृथ्वीवर) घनदाट व्यापून आहे. पाताळ फोडून पाहिले तरी, त्याचा तळ सापडणार नाही. किंवा आकाशापलिकडे पाहिले तरी त्याचा अंत(शेवट) समजणार नाही. सर्वसामान्य मानवाला हे कळत नाही. जोपर्यंत त्याची जाणीव करुन देणारा पूर्ण सद्गुरु जीवनात येत नाही.

नांदतसे नाम आकाश पाताळी।
सर्व भू मंडळी घनदाट।।१।।
पाताळ फोडो नि किती आहे पुड।
नाही अंतवाड नभवरी।।२।।
चौऱ्यांशी भोगिती दुर्गती पामर।
नाही सारासार जाणत ते।।३।।
नामदेव म्हणे नाम अविनाश।
तेथे नाना वेष नाम सर्व ।।४।।

(संत नामदेव गाथा अ.क्र. ६६४)

मानवाने गुरु मतानुसार चालल्यास, नामाचा आधार जीवनात घेतल्यास, कशालाही तोटा येणार नाही. जीवनात कोणत्याही प्रकारची न्यूनता राहणार नाही. नामामध्ये एवढी ताकद आहे की, कोणतेही काम बिघडले तरी, ते क्षणात ठिक होते. नाम ज्ञानदृष्टीने सद्गुरुपर्यंत जाण्याचा मार्ग दाखविते सद्गुरु मतांनुसार चालण्यास शिकविते. ज्याने प्रभू नामावर विश्वास ठेवला, त्याच्या घरांत सदैव शांती नांदते, त्याचे घर एकप्रकारे स्वर्ग बनते, घरात कशालाही तोटा राहत नाही. हे नाम पूर्ण सद्गुरुपाशीच मिळते, सद्गुरुच जाणीव करुन देतात, कारण पूर्ण सद्गुरु नामाचा व्यापार करतात! शरण आलेल्या सर्वांना ते नाम वाटतात. समयाच्या सद्गुरुने याला 'निरंकार ' हे नाम दिले आहे जो हे जाणतो तो निरंकारी!

नाम दवा साऱ्या रोगाची सर्वही दु:ख मिटवी नाम।
बलशाली प्रभूनाम असूनी काम बिघडले बनवी नाम।
ज्ञान दृष्टी ज्या पाशी नाही मार्ग तया दाखवीते नाम।
स्वर्ग रुप ते बनून जाते घरात ज्याच्या राहे नाम।
पूर्ण सदगुरु जगी लोक हो नाम व्यापार करी।
निरंकार हे नाम तयाचे जो जाणे तो निरंकार।

(सं. अ. प. क्र. ३११)

अशी प्रभुनामाची आवड मानवाने जीवनात जोपासली ,उपभोगिली त्यांच्यासारखे या मार्गाने साधुसंत गेले त्याच मार्गाने इतरांनी जावे, अन्य मार्गाचा अवलंब करु नये, कारण त्याने प्रभू प्राप्ती होणार नाही. अन्य मार्गाने केवळ

(पान ३४ वर)

प्रत्येक सेवा महान आहे.....

सौ. जयश्री कृष्णात जाधव
शिवनगर, सातारा

परउपकार म्हणजे सेवा. आज समयाच्या सद्गुरु ने शिकवण दिली आहे की - सेवेची सुरुवात घरापासून करा. मानवाला समज असून सुध्दा मानव कोणाच्या उपयोगी येत नाही. घरातील सदस्य असो, आपल्या शेजारी व्यक्ती असो किंवा समाजातील इतर सदस्य असो संकट समयी कोणी कोणाला मदत करत नाही. पण तेच संकट आपल्यावर आल्यावर असे वाटते की आपल्याला कोणी तरी मदत करायला हवी. म्हणूनच आपण जीवन जगत असताना नेहमी दुसऱ्यांना मदत करावी. तेव्हाच दुसरी व्यक्ती सुध्दा आपल्याला मदत करेल.

अवतार वाणीच्या पद क्र. २२६ मध्ये बाबा अवतारसिंहजी यांनी सांगितले आहे की,

तन, मन, धन सर्वांहून उत्तम, सेवा ती गणली जाते.
जी होई निष्काम निरच्छीत, सद्गुरुला ती आवडते.

तन, मन, धनाने प्रत्येक जीवमात्राची सेवा केली पाहिजे. निस्वार्थी पणाने केलेली सेवा सद्गुरुला आवडते. निस्वार्थी सेवा कशी करावी याचे एक उत्तम उदाहरण आहे की, गुरु मच्छिंद्रनाथ यांचे शिष्य गोरक्षनाथ एके दिवशी भिक्षा मागत मागत ब्राम्हणाच्या घरी गेले त्यांच्या घरी पितृतीथी होती. म्हणून त्या घरी चांगली पक्क्वांने तयार केली होती म्हणून त्या घरी भरपूर भिक्षा मिळाली. त्या परिवाराला भरपूर आशीर्वाद देऊन गोरक्षनाथ यांच्या जवळ गेले. ती भिक्षा पुढे ठेवून दोघे समाधानाने जेवले पण त्या जेवणातील वड्यांवर गुरु मच्छिंद्रनाथांची वासना राहिली त्यामुळे गोरक्षनाथांस मच्छिंद्रथांनी वडे आणण्यास सांगितले. गोरक्षनाथांना पुन्हा भिक्षा मागण्यास आलेले पाहून त्या घरच्या स्त्रीला राग आला. ती म्हणाली आताच तर पान वाढून दिले होते तरीही तुम्ही परत आला. गोरक्षनाथांनी स्पष्ट सांगितले माझ्या गुरुंना वडे पाहिजेत म्हणून मी आलो आहे. तेव्हा त्या स्त्रीने गोरक्षनाथांची परीक्षा घेण्याचे ठरविले आणि गोरखनाथांस एक डोळा मागितला. त्याच क्षणी गोरक्षनाथांनी तिला डोळा काढून दिला. हे दृश्य पाहून त्या स्त्रीला खूप वाईट वाटले. गोरक्षनाथांनी जाते वेळेस डोळ्यावर पट्टी बांधली ते गुरु मच्छिंद्रनाथांच्या जवळ पोहचले. गुरु मच्छिंद्रनाथांनी डोळ्याला काय झाले हे विचारले असता गोरक्षनाथांनी सांगण्यास नकार दिला. पण गुरुच्या आग्रहामुळे त्यांनी घडलेला सर्व प्रकार सांगितला. तेव्हा गुरु मच्छिंद्रनाथांनी यांचा डोळा पूर्व अवस्थेत लावला. सांगण्याचा भावार्थ असा की, गुरु अंतरयामी असतात. गुरु केवळ शिष्याचा भोळा भाव बघतात, गुरु तर दाता असतात शिष्य जेव्हा निस्वार्थी भावाने सेवा करतात. तेव्हा शिष्याला न मागता सर्व सुखं

प्राप्त होतात. अवतार वाणीच्या पद क्र. ३०२ मध्ये बाबा अवतारसिहंजी महाराज सांगतात की,

गुरु आज्ञेचे पालन करुनी, सेवा करणे गुरुभक्ती.

गुरुला मानण्यापेक्षा गुरुचा आदेश, उपदेश आचरणात आणले पाहिजे. गुरुने दिलेली सेवा कोणतीही असो ती आनंदाने केली पाहिजे. भगवंताने सृष्टी निर्माण केली, त्या निसर्गामध्ये सर्व प्रकारची झाडे व वेली, पशू-पक्षी, प्राणी सर्वच जीव मात्रावर प्रेम केले पाहिजे. त्यांची सेवा केली पाहिजे. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात. हे सर्व आमचे

सगे सोयरे आहेत. म्हणजेच आपले नातेवाईक आहेत. भगवंतांनी मानव प्राण्याला एकमेकांच्या उपयोगी पडण्यासाठी बनविले आहे. जसे नर-मादी किंवा नर-नारी प्रत्येक जीव मात्राला प्रत्येकाला प्रत्येकाचा आधार घ्यावा लागतो म्हणून प्रत्येक जीवाची मनोभावे सेवा करणे, दुसऱ्यांना सहकार्य करणे यात जीवन जगणे महत्त्वाचे आहे. आपण एखाद्यास मदत केली तर ती निस्वार्थपणाने करावी कोणत्याही फळाची अपेक्षा करु नये. प्रत्येक सेवा महान आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे गुरु समर्थ रामदास स्वामी यांच्या जीवनातला गुरु शिष्य प्रसंग आठवला. छत्रपती शिवाजी महाराज शिकारीला गेले होते. त्यांच्या सोबत त्यांचे शिपाई होते. शिवाजी महाराजांना वाटले इथे कुठे तरी गुरु असतील आपण गुरुचे दर्शन घेऊ म्हणून शिवाजी महाराज आणि त्यांचे शिपाई गुरुचा शोध घेऊ लागले. खूप वेळ शोधता-शोधता शिपाई कंटाळले आणि एका जागी बसले. पण शिवाजी महाराजांना वाटले काही झाले तरी गुरुचा शोध घेतला पाहिजे म्हणून ते शोध घेत राहिले व काही वेळाने गुरु दरीच्या ठिकाणी असहाय्य अवस्थेत परतलेले दिसले. त्यांच्या मांडीला दुखापत झाली होती. शिवाजी महाराजांनी गुरुला विचारले काय झाले? तेव्हा त्यांनी सांगितले की, माझ्या मांडीला दुखापत झाली आहे तेव्हा तू वाघीणीचे दूध घेऊन येता का? गुरुची आज्ञा मानून शिवाजी महाराजांनी जंगलात गेले आणि गुहेचा मार्ग धरला. गुहेजवळ शिवाजी महाराजांना पाहून वाघीण त्यांच्या अंगावर धावून आली. शिवाजी महाराज आणि वाघीणीमध्ये खूप वेळ झटापट सुरु होती. शिवाजी महाराज रक्तबंबाळ झाले तरीही त्यांनी वाघिणीला सोडले नाही. अखेरीस त्या वाघिणीचे दूध घेऊन शिवाजी महाराज गुरुजवळ आले. वाघीणीच्या दुधामुळे गुरुच्या मांडीची दुखापत गेली आणि शिवाजी महाराजांना भरपूर आशिर्वाद दिले. निस्वार्थ पणाने सेवा कशी करावी याची शिकवण आपल्याला शिवाजी महाराजांनी दर्शवली. तन, मन, धनाने निस्वार्थपणे सेवा घडावी हीच सद्गुरु चरणी प्रार्थना आहे.

❁❁❁

नामाची आवडी तोचि ... (पान ३२ वरुन)

दु:खच पदरात पडेल. ईश्वराचे नामस्मरण आवडीन घेणे हाच देव आहे. जो आवडीने भगवंताचे नामस्मरण करतो, त्याला प्रभू प्राप्तीसाठी अन्य साधन करण्याची गरज नाही. नामाव्यतिरीक्त प्रभुप्राप्तीचे दुसरे साधन नाही. नाम घेतल्यानेच सुखच सुख प्राप्त होईल असे तुकाराम महाराज म्हणतात-

नामाची आवडी तोचि जाणा देव ।
न धरी संदेश काही मनी ।।१।।
ऐसे मी हे नाही बोलत नेणता ।
आणोनि संमता संताचिया ।।२।।
नाम म्हणे तया आणि साधन ।
ऐसे हे वचन बोलो नये ।।३।।
तुका म्हणे सुख पावे या वचनी ।
ज्याची शुध्द दोन्ही मायबापे ।।४।।

(संत तुकाराम गाथा अ. क्र. ८२०)

संत तुकाराम महाराज स्वत:साठी आणि जनकल्याणासाठी, या सर्वव्यापक परमेश्वराकडे आपल्या अभंगात मागणे मागतात. जे मानवाच्या हिताचे आहे जन्माला आल्याचे सार्थक करणारे आहे. महाराज म्हणतात हे परमेश्वरा! तुझ्या प्राप्तीसाठी तुझे गोड नाम मी सतत घेईन, तुझ्या नामाशिवाय अन्य कोणतेही साधन अवलंबणार नाही. तेव्हा हे प्रभू तू कृपा कर! तुझ्या नामाचा विश्वास माझ्या हृदयात सतत ठेव. काया वाचा मनाने हे मी तुझ्याकडे मागणे मागतो! देवा! आणि एक कृपा माझ्यावर कर! ती म्हणजे मला सतत संताची, तुझ्या भक्तांची संगत दे! त्यामुळे माझे मन तुझ्या नामा रंगून राहील. इकडे तिकडे भटकणार नाही!

हरी तुझे नाम गाईन अखंड ।
याविण पाखंड नेणें कांही ।।१।।
अंतरी विश्वास अखंड नामाचा ।
काया मने वाचा हे चि देई ।।२।।
तुका म्हणे आता देई संत संग ।
तुझे नामी रंग भरो मना ।।३।।

(संत तुकाराम गाथा अ.क्र. ३१२१)

❁❁❁

संत समागम : प्रभावितेसाठी की प्रभुभावितेसाठी

श्री. मनोज गणपत कदम
कांजूरमार्ग पूर्व

मनुष्य जन्माला येणे, सद्गुरुची व संतांची भेट आणि त्यांना ओळखून त्यांचा सहवास घडणे या तिन्ही गोष्टी फारच दुर्लभ आहेत. म्हणूनच संत समागमासारखा लाभ नाही, असे म्हणतात. संत समागम म्हणजे परमेश्वरापर्यंत घेऊन जाणाऱ्या सर्व साधनांचा राजा होय. आगगाडीत बसणारे सर्व प्रवासी, मग ते कोणत्याही क्लासमधून प्रवास करणारे असोत, शेवटच्या स्टेशनपर्यंत जाऊन पोहोचतात. त्याचप्रमाणे संतसमागम करणारे सर्व साधक भगवंतापर्यंत जाऊन पोहोचतात. हाच तर संतसमागमाचा महिमा आहे. अशा या मौलिक आणि लाभकारक संत समागमामध्ये आपणास सहभागी करुन सद्गुरुनी जो कृपेचा वरदहस्त आपल्या माथ्यावर ठेवला त्याबद्दल श्री सद्गुरुंना लाख लाख धन्यवाद.....

निरंकारी संत समागमामध्ये आपण साऱ्यांनां स्वर्ग सोहळ्याचा अनुभव घेतला. संत सहवासाच्या वातावरणात प्रभुभक्तीचा मनमुराद आनंद लुटला. सर्व संत महात्म्यांच्या आगमनाने व श्री सद्गुरुच्या एकमात्र दर्शनाने प्रत्येकाच्या अंत:करणात आनंदाचा महापूर येऊन, प्रेमाभक्तीच्या लाटा उसळताना आपण पाहिल्या. प्रत्येकजण एकमेकांना हात जोडीत, एकमेकांच्या पायी आपले मस्तक झुकवून, भौतिक दृष्ट्या जरी आम्ही विद्वत्तेने, प्रतिष्ठने, संपत्तीने, सत्तेने कितीही मोठे असलो तरी परमपिता परमेशवराचे दास आहोत व मानवतेचे पुजारी आहोत, हाच दिव्य संदेश विश्वातील मानवमात्राला देत आहेत, हेच प्रत्ययास आले. संतमहात्म्यांच्या मुखातून निघणाऱ्या अध्यात्मिक विचारधारेच्या अमृतसागरात सारेच न्हात होते. भक्ती भावाच्या रंगात रंगत होते. सद्गुरुचे साकार रुप आणि संतसमागमाचे स्वर्गमय दृश्य आपल्या हृदयरुपी कॅमेऱ्यामध्ये बंदिस्त करण्यासाठी प्रत्येकजण तत्पर झाले होते. हा सुख सोहळा अनुभवताना आपण देखील मानवता दर्शविणाऱ्या मानव शृंखलेची एक कडी कधी बनलो, हे आपणास समजलेच नाही. इतकेच नव्हे तर काळ, वेळ, तारीख, वार त्याच बरोबर मनातील भय, चिंता, दु:ख आणि सांसारिक समस्या, या साऱ्यांचा विसर कधी पडला, हे आपले आपल्यालाच कळले नाही.

असा हा सुखाचा ठेवा प्राप्त करुन देणारा, जीवा शिवाचं मिलन घडवून आणणारा, अंत:करणातील ज्ञान दिवा प्रज्वलीत करणारा, प्रेमाभक्तीला द्विगुणित करणारा, मानवतेचे दर्शन घडविणारा, दिव्य गुणांची बाग फुलविणारा, मानवी मूल्यांची जागृती करुन देणारा आणि पारलौकिक, एकत्व आणि दिव्यत्वाचा साक्षात अनुभव घडवून देणाऱ्या निरंकारी संत समागमाचा आपण साऱ्यांनी प्रत्यक्ष लाभ घेतला, म्हणून आपल्यासारखे भाग्यशाली आपणच!

संत समागमाच्या त्या चार दिवसांमध्ये समर्थ सद्गुरुचे आशीर्वाद आणि श्री सदगुरुंनी शिकवलेल्या दिव्य गुणांची, मानवी मूल्यांची शिकवण घेऊन आपण साऱ्यांनी आपापल्या संसारामध्ये (प्रपंचात) पुन्हा पदार्पण केले आणि आपले दैनंदिन जीवन सुरु झाले. या संसाराच्या रोजच्या धावपळीत सुख-दु:खाचा खेळ खेळताना, इच्छा महत्त्वाकांक्षाच्या मागे पळताना, भविष्याची स्वप्ने रंगवून त्यांना साकाररुप देताना आपण या संसारात इतके रममाण होतो की, संतसमागमातून प्राप्त केलेल्या संत महात्म्यांच्या शिकवणीचा आपणांस हळूहळू विसर पडू लागतो. कारण संसार ही एक अशी नशा आहे आहे जी उत्तरोत्तर चढतच जाते. जसे व्याजावर व्याज वाढतच जाते, तसा संसार वाढतच जातो. या वाढत्या संसारासोबत संपत्ती, सत्ता, सौंदर्य, सामर्थ्य, उच्च शिक्षण, उच्चअधिकार, मान प्रतिष्ठा, ऐषोआराम आणि विलासी जीवन उपभोगण्याची इच्छा अधिकाधिक वाढतच जाते. या इच्छापूर्तीच्या नादात मनावर झालेला संतविचारांचा प्रभाव कमी कमी होत जातो आणि मनावर संसाराच्या विषय, विकारांचा प्रभाव वाढू लागतो. पण हे स्वाभाविक आहे. जसे कोळशाच्या खाणीतून चालताना कोळशाचा काळा रंग अथवा कालीख आपल्या स्वच्छ कपड्यांना लागून, आपले कपडे मलीन होणारच तद्वत संसाराच्या विषयवासनेत वावरताना आध्यात्मिक

विचारधारेने निर्मळ व सात्विक झालेले मन विकारांमुळे मलीन होणारच. जर यदाकदाचित पुन्हा संत महात्म्यांचा सहवास लाभला तर काही काळपुरता या मानवी मनावर संत विचारांचा, वागणुकीचा ठसा उमटून जीवन शांत व आनंदी होते. परंतु जसजसा संतजनांचा सहवास दुरावतो, तसे हे मानवी मन लगेच संसाराच्या विषयांचा आधार घेऊन विषय भोगण्यात मग्न होते. त्यामुळे मानवी मनातून दैवी गुणांचा प्रभाव वाढीस लागतो व त्यातूनच भय, दुःख, पाप, संकटे, दृष्ट विचार, वाईट सवयी आणि मनाची अस्थिरता या गोष्टी आपल्यासमोर येऊन उभ्या राहतात. अशी ही आपली अवस्था अगदी बाळकृष्णाला डोक्यावर घेतलेल्या त्या वसुदेवासारखी झाली आहे. जो पर्यंत वसुदेवाच्या डोक्यावर कृष्ण (ब्रह्म) होते, तोपर्यंत वसुदेवाचा प्रवास हा बंधनातून (कारागृह) मुक्ततेकडे सुरु होता. पण ज्या क्षणी वसुदेवाने कृष्णाला (ब्रह्म) नंदराजाकडे ठेवून त्यांची मुलगी (माया) डोक्यावर घेतली, त्या क्षणापासून वसुदेवाचा प्रवास मुक्ततेकडून बंधनाकडे सुरु झाला. अगदी त्याप्रमाणे जोपर्यंत आपल्या ध्यानी मनी अध्यात्म (ब्रह्म) आहे, तो पर्यंत आपण परमार्थिक आणि ज्याक्षणी आपल्या ध्यानी मनी संसार(माया)असतो, तेव्हा आपण संसारी थोडक्यात सांगायचे म्हणजे-

गंगा मे गया तो गंगादास और जमुनामे गया तो जमुनादास

या संसाररुपी सागरात प्रवास करीत असताना आपल्या अंतःकरणात अनेक लाटा उसळत असतात. त्यात अशी एक लाट आपल्या अंतःकरणात परमात्म्याचा भक्तीभाव जागृत करते. परत दुसरी लाट येऊन आपल्या अंतकरणात नश्वर संसाराची आसक्ती निर्माण करते. पुन्हा एक लाट अशी येते की जी आपल्याला मानवतेच्या पंक्तीत नेऊन बसवते. परत दुसरी लाट अशी येते व ती आपणास दानवतेच्या गणतीत नेऊन जमा करते. पुन्हा एक लाट अशी येते की जी आपल्या अंतःकरणात दिव्य गुणांची बाग फुलविते. तर दुसरी लाट येते व दिव्य गुणांनी बहरलेली ही बाग उध्वस्त करुन टाकते. तेवढ्यात पुन्हा एक लाट येऊन आपल्याला शाश्वत आनंदाच्या पैलतीरावर घेऊन जाते आणि मुक्तीचा साक्षात अनुभव घडवून जीवाची दशा संपविते. ही जीवाची दशा संपतेय तोपर्यंत दुसरी लाट येते आणि पुन्हा भवसागराच्या मधोमध नेऊन अशांती व अस्थिरतेच्या वादळात आपल्या जीवाची दिशाभूल करते. अशा अनेक लाटा अंतःकरणात उठून लय पावत असतात आणि आपणास आध्यात्मिकतेपासून दूर करुन संसाराच्या अधीन राहण्यास प्रवृत्त करत असतात.

पण हे सुखविलासाच्या अधीन झालेले जीवन म्हणजे मृगजळ आहे, ते फसवे आहे. अशा फसव्या सुखाच्या मागे मी का बरं लागावं, हे कळत असून सुध्दा आपल्या मनावर ते ठसत नाही. कळतयं पण वळत नाही. कारण जशी संगत तशी रंगत. मनाला पाण्याप्रमाणे उतार म्हणजेच अधःपतनाकडे घेऊन जाणारी संगत आवडते म्हणूनच बरेचसे जीव संसाररुपी बंधनात अडकलेले, फसलेले असतात. म्हणूनच आपले संसारावर जेवढे प्रेम आहे, श्रध्दा भाव आहे, तितका ईश्वराच्या ठायी नाही. कारण आजतागायत भक्तीपंथाच्या माध्यमातून आपण परमार्थाची वाटचाल करत आहोत. पण ती केवळ देहाने; अंतःकरणापासून नव्हे. अध्यात्मिकतेचा धडा आपण गिरवला. पण तो केवळ परंपरा म्हणून माझे कर्तव्य म्हणून नव्हे. संत सावतामाळींनी वारकऱ्यांसोबत पाठवलेला भोपळा सर्व तीर्थात न्हाऊन आणि संत सहवासात राहूनसुध्दा आपल्या स्वभाव गुणांना त्यागू शकला नाही, शेवटी तो कडूच राहिला. अगदी त्याप्रमाणे आपण समागमाच्या वातावरणात, संत सहवासात वावरलो पण मनापासून, अहंकाररहित होऊन आम्ही जर संत समागमाचा आनंद घेतला नाही तर मग मनाची कटुता गेली नाही. संकुचितपणा, दुजाभाव संपला नाही. संसाराविषयी मोह, आसक्ती कमी झाली नाही. मानवी स्वभावातील अहंकार आणि स्वार्थ संपुष्टात आला नाही. आपल्या मनावर अध्यात्माचा प्रभाव कायम रहावा, मन हरी भजनात दंग होऊन त्यावर भक्तीचा रंग चढावा, मन निर्मळ, विनम्र आणि निस्वार्थ भावनेने परिपक्व व्हावे, सद्गुरु आणि गुरुबंधू विषयी आपल्या मनी नेहमी श्रध्दा व आस्था कायम रहावी, ब्रह्मज्ञानाची कदर आणि संताचा आदर ध्यानी मनी कायम रहावा, ह्या मनात दैवी गुणांची एक सुंदर बाग फुलून त्यांचा सुगंध आपल्या जीवनात बहरावा, आपल्याला शाश्वत आनंदाची प्राप्ती व्हावी, असे अंतकरणापासून आपल्याला वाटलेच नव्हते.

श्री सद्गुरुंनी आम्हाला शिकवले की ईश्वराशी एकनिष्ठ रहा, संतानी सांगितलेल्या मार्गावर मार्गस्थ व्हा व ईश्वरीय आनंद मिळवा. आपल्या नावाला आणि कुळाला कलंक लागेल असे काहीही करु नका. आतापर्यंत लाखो शिष्य झाले पण अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतक्यांनीच या संतांचा व सद्गुरुचा वसा घेतला. अनेकजण संतांच्या या आध्यात्मिक विचारसरणीचे भोक्ते बनले परंतु त्यांचे सद्गुण आपल्यात यावेत, मुरावेत यासाठी प्रयत्न करणारे विरळेच. आम्हाला वाटते की आम्ही संसारात नसलो की संसार चालणार नाही. हेच अज्ञान म्हणजे आमच्यातील मुख्य दोष आहे. संसार व त्यातील विषय आपल्याला बंधन न वाटता सुखाचे वाटतात. या विषयसुखासाठी आपण सन्मार्गही सोडायला आणि साधुबोधही विसरायला तयार असतो. कल्पनारुपी संसारात जो रंगला त्याची मात्र सुटका नाही. या संसाररुपी दुःखसागरात जन्मोजन्मी गोते खात रहाणं हेच आपले विधिलिखित म्हणायला हवे ना!

परंतु ज्यांच्या विधिलिखिताचा विधाता सद्गुरु आहे, ज्यांच्या जीवननौकेचा नावाडी सद्गुरु आहे, ज्यांच्या जीवन इमारतीचा पाया ब्रह्मज्ञान आहे, ज्यांना जीवनाचा परमअर्थ समजला आहे, ज्यांच्या जीवनात सद्गुरु आणि अध्यात्माला सर्वोच्च स्थान

आहे. ज्यांच्या अंत:करणात संत व त्यांच्या विचारधारेबद्दल कायम आदर आणि कदर आहे. ज्यांना मानवतेची आणि माणुसकीची जाण आहे, ज्यांना आपण सद्गुरुचे शिष्य आहोत याचे सदैव भान आहे, ज्यांना संसार क्षणभंगूर व नश्वर असून परमेश्वरच सत्य आणि शाश्वत आहे याचे परिपूर्ण ज्ञान आहे, असे भक्त (शिष्य, गुरुसिख) हे, 'गंगा में गया तो गंगादास और जमुनामें गया तो जमुनादास', या भूमिकेत कधीही जगत नाही. त्यांना संसाराचे गुलाम होणे कदापि पटत नाही कारण ते रामाचे गुलाम बनून राहण्यातच आपले सौभाग्य मानतात. काळ, स्थळ, प्रसंग अथवा परिस्थिती बदलली तरी ते आपल्या संत (भक्त) प्रवृत्तीत, स्वभावात तीळमात्रही बदल करीत नाहीत. जसे पाणी आपली शीतलता आणि दुसऱ्याची तहान भागवण्याची आपली प्रवृत्ती कधीही त्यागत नाही, अगदी तसेच संत समागम असो वा संसार असो, संत आपला भक्त स्वभाव कधीही सोडत नाहीत. कारण त्यांचे परमात्म्याशी नाते जोडले गेलेले असते. त्यामुळे ते जिथेही जातात तिथे आध्यात्म ज्ञानाचा व सद्गुरुच्या शिकवणूकीचा आपल्या कर्माने प्रचार करतात. संतांमध्ये वावरताना ते जेवढे विनम्रता, सहनशीलता, विशालता व समदृष्टीच्या भावनेने व्यापक असतात, तेवढेच संसारामध्ये विचरण करतानाही असतात. 'संसारी असोनी, संसारी नसावे', या संतउक्तीप्रमाणे त्यांची अवस्था बनली असल्यामुळे ते दुनियेत कुठेही मायेच्या बाजारात असले तरी परमार्थाच्या बाहेर ते जात नाही. संतांच्या आणि आपल्या बुध्दिच्या पातळीत हा फरक आहे, अंतर आहे. हे अंतर आपल्याला खोडून काढायचे आहे. मर्मखूण जाणून घ्यावयाची आहे. आपली बौध्दिक पातळी वाढवायची आहे. एखाद्या दगडावर छिन्नी हातोड्याने एखादी रेघ मारली तर ती कधीही पुसली जाणार नाही. वाळूवर रेष काढली तर कदाचित काही तास ती टिकेल परंतु पाण्यावर रेष काढली तर! इथून काठी फिरवून तिथे जाईपर्यंत ती रेष पुसली जाते. आपले मन, अंत:करण पाण्याप्रमाणेच असायला हवे. त्यावर उमटणारी संसाराची रेष लगेच निघून गेली पाहिजे.

आजपर्यंत आपण देहासाठी, संसारासाठी खूप काही केले पण आता मनासाठी काहीतरी करायला हवे. चांगले वागावे, चांगले करावे असे जरी अंतर्रात्म्याला वाटत असले तरी हे मन तसे करु देत नाही. सारथ्याच्या हाती लगाम असूनही जर त्याने त्याचा उपयोग केला नाही तर उधळलेला घोडा काट्याकुट्यात, रानावनात घेऊन जातो. म्हणूनच चिंता, भय, दु:ख आणि संकटाच्या काट्याकुट्यातून घेऊन जाणाऱ्या ह्या वासनाधीन मनाला (घोड्याला) वेळीच लगाम घातला पाहिजे. 'शुध्द करा रे मन, व्हावे देहातीत!', या संतउक्तीप्रमाणे देहातीत होण्यासाठी मनाला शुध्द व निर्मळ केले पाहिजे. त्यासाठीच सत्संग आहे. सतसंगातील विचारधारा शुध्द असते, कारण ती संतांच्या मुखारविंदातून आलेली असते, आत्मउन्नतीकारक असते.

असा आत्मउन्नतीचा धडा जो आपण संतसमागमामध्ये शिकलो तो सहजपणे विसरण्यासाठी नव्हे तर जीवनात उतरवण्यासाठी त्याची अंमलबजावणी करण्यासाठी. कारण आपण केवळ स्वर्ग व रामराज्याची कल्पना करुन त्यावर काव्य करणारे कवी नसून, स्वर्गसुखाचा अनुभव घेणारे अनुभवी आहोत. आपण मानवता, एकत्व या विषयावर विचार व्यक्त करणारे फक्त विचारवंत नसून मानवता धर्माला जाणणारे जाणकार आहोत. आपण संसारात गुंतणारे फक्त संसारी नसून प्रपंच नेटका करुन विवेकाने परमार्थ करणारे अध्यात्मिक व्यक्ती (मानव) आहोत. अध्यात्मिक व्यक्ती हा केवळ एक शब्द नसून एक मोठी जबाबदारी आहे. म्हणूनच फक्त नावाचे आध्यात्मिक व्यक्ती बनून चालणार नाही तर कर्तव्यदक्ष आध्यात्मिक व्यक्ती बनावे लागेल. कारण आपल्याला या विश्वात विचरण करणाऱ्या मानवसमाजातील अज्ञानाचा अंध:कार दूर करायचा आहे. मानवमानवातील वाढलेले अंतर कमी करायचे आहे. धर्म, जात, वर्ण, भाषांचे भेदभाव संपवून साऱ्यांनाच मानवतेच्या शृंखलेत जोडायचे आहे. मानवाचे दु:खमय जीवन सुखमय करायचे आहे. विश्वातील प्रत्येक मानवापर्यंत या अध्यात्मज्ञानाला पोहोचवायचे आहे. या भूतलावर शांती, प्रेम आणि ऐक्याचे साम्राज्य प्रस्थापित करायचे आहे. हे महान कार्य करण्यासाठी प्रथम आपल्याला अध्यात्मज्ञानावर दृढ व्हावे लागेल. आपल्यातील अंतर अजून कमी करावे लागेल. आपल्याला मानवतेच्या शृंखलेत हातात हात घालून उभे रहावे लागेल. आपल्यातील भेदभाव, हेवे दावे संपुष्टात आणावे लागतील. नश्वर संसाराच्या किंचित अशा फायद्यासाठी आपण जी लाचारी पत्करली आहे ती झुगारुन द्यावी लागेल. अध्यात्मिकतेला शोभेल, सद्गुरुच्या नावाला भूषेल आणि समस्त मानव समाजाला आदर्श ठरेल असे जीवन आपल्याला जगावे लागेल. म्हणूनच आपल्या जुनाट व भोळसट समजुती, वाईट सवयी, चतुरपणा, दिखावटीपणा, विपरित भावना आणि अहंकारी वृत्ती यांचा त्याग करावाच लागेल.

अचानक धनलाभ झाल्यावर आपले राहणीमान उच्च दर्जाचे होते. हा बदल आपोआपच होतो त्यावेळी कोणी सांगावे लागत नाही. तद्वत आपल्याला सद्गुरुच्या कृपेने रामरतन

धनाची प्राप्ती झाली आहे म्हणून आपल्या मनासही परमार्थिक श्रीमंती प्राप्त व्हावयास हवी आणि अशी ही परमार्थिक श्रीमंती प्राप्त केलेल्या संतांच्या पावलावर पाऊल टाकीत त्यांच्या मार्गाने मार्गक्रमण करीत, त्यांना लाभलेल्या शाश्वत सुखापैकी काही कण वेचणे आपल्यासाठी अगत्याचे आहे. कारण हे कण इतके मौल्यवान आहेत की त्यावरुन आपले आयुष्य ओवाळून टाकावे.

ते मौल्यवान, आनंददायी कण (क्षण) आपल्याला मिळवायचे आहेत. म्हणून मी सत्संग, स्मरण, सेवा करतो ते माझ्यासाठीच, हा साक्षात्कार आपणास झाला पाहिजे. परीक्षेत सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण होतात. पण अधिकाधिक अभ्यास करुन प्रथम श्रेणीत येणारे फार कमी असतात. तद्वत भक्त सर्वच असतात, परंतु भगवंताच्या परीक्षेत प्रथम श्रेणी प्राप्त करण्यासाठी सद्गुरुला अपेक्षित आचरणाची कास धरावी लागेल. एखाद्या मुलाला आईवडील अभ्यासाला बसवतात. सतत त्याच्यामागे तगादा लावतात. अध्यात्मामध्ये तसे करुन उपयोग नाही. इथे सर्वकाही आपल्यालाच करायचे आहे. ऐहिक जीवनात राहून जीवनमुक्तीचा आनंद मिळवण्यासाठी स्वप्रयत्नच उपयोगी पडतात. दुसऱ्याची बळजबरी नव्हे.

म्हणूनच आतापर्यंत जो अहंकार मी व माझ्यासाठी धरलाय तो सोडावा लागेल. हा अहंकाराचा उंबरठा जोपर्यंत ओलांडला जात नाही तोपर्यंत अलौकिक आनंदाची प्राप्ती होणे नाही.

आपल्याला वाटते की सर्वांनी माझ्यावर प्रेम करावे. कोणीही माझा रागद्वेष करु नये. सर्वांनी माझा आदर सत्कार करावा. कोणीही माझा अपमान करु नये. सर्वांनी माझी स्तुती करावी. कोणीही माझी निंदा करु नये. सर्वांनी मला पुढाकार द्यावा. कोणीही मला मागे खेचू नये सर्वांनी माझ्या चुका व अवगुणांवर पडदा टाकावा व कुणीही त्या जाहीर करु नये, अशी सर्वांची अपेक्षा असते पण दुसऱ्यांनाही आपल्याकडून हीच अपेक्षा आहे हे नाकारून चालणार नाही. म्हणूनच आपण सर्वप्रथम सर्वांवर प्रेम केले पाहिजे. सर्वांचा आदर सत्कार केला पाहिजे सर्वांचे कौतुक केले पाहिजे. सर्वांना पुढाकार दिला पाहिजे. सर्वांच्या चुका व अवगुणांवर पडदा टाकला पाहिजे. सर्वांना क्षमा केली पाहिजे. माझे नाव, घराणे, कर्तृत्व, मान-सन्मान, पद-पदवी आणि अधिकार हे सारे विसरुन निःस्वार्थ भावनेने सकळ जीवसृष्टीबद्दल, प्राणिमात्राबद्दल आपलेपणा, कणवाळूपणा, दयाळूपणा आणि निर्मळ प्रेम निर्माण केले पाहिजे. त्यात कोणताही भेदभाव व अंतर असू नये. माझ्याकडे जे काही चांगले आहे ते इतरांना मिळावं अशा भावनेने जेव्हा आपण इतरांना देतो, तेव्हा भगवंत हजार हातांनी आपल्याला देत असतो.

परंतु, यदाकदाचित हे ईश्वरीय कार्य करणे आपणास अवघड किंवा अशक्य आहे असे वाटत असेल तरी काही हरकत नाही. सद्गुरुने जे करायला सांगितले आहे ते करण्यास आपण कमी पडत असलो तरी एक वेळेस चालेल पण सद्गुरुंनी जे नाही करण्यास सांगितले आहे तेवढे जरी आपण नाही केले तरी खूप झाले. आपल्याला सर्वांवर प्रेम करता येत नसेल तरी चालेल पण कोणाचाही राग द्वेष आपण करता कामा नये. कुणाची स्तुती करता येत नसेल तरी चालेल पण कुणाची निंदा करु नये. कुणाला पुढाकार देता येत नसेल तरी चालेल पण कुणाला मागे खेचू नये. कुणाला परमार्थिक सेवेशी जोडता येत नसेल तरी चालेल पण कुणाला परमार्थिक सेवेपासून वंचित किंवा दूर करु नये. कुणाचा संसार उभा करता येत नसेल तरी चालेल पण कुणाचा संसार उध्दस्त करु नये. कुणाला हसवता आले नाही तरी चालेल पण कोणाला रडवू नये. कुणाला वर उचलता आले नाही तरी चालेल पण कुणाला खाली पाडू नये. कुणाचे भले करता आले नाही तरी चालेल पण कुणाचे वाटोळे करु नये. मानवता स्थापित करण्यासाठी रस्त्यावर उतरता येत नसेल तरी चालेल पण दानवतेच्या रस्त्यावर कदापि चालू नये. आपल्याला प्रेमाची बाग फुलवता आली नाही तरी चालेल पण कुणाची प्रेमाची बाग उध्दस्त करु नये. सत्याचा प्रचार करता येत नसेल तरी चालेल पण असत्याचा व अंधश्रध्देचा प्रचार करु नये. आपल्याला कुणाच्या भक्तीत साधक बनता आले नाही तरी चालेल पण कुणाच्या भक्तीत मी बाधक बनणार नाही याची खबरदारी घ्यायला हवी. इतके जरी आपणास करता आले तरी श्रीसद्गुरुचे अनंत आशीर्वाद आपणास प्राप्त होतील आणि ज्या संतसमागमाचा आपण लाभ घेतला त्याचे खऱ्या अर्थाने सार्थक होईल. कारण संतसमागम अथवा सत्संग म्हणजे संत जे सांगतात, वागतात तसे आपण वागणे, करणे. संत हे कधीही कोणाचेही अहित करत नाहीत ते दुसऱ्यांना त्रास, पिडा देत नाहीत. ते कुणालाही दुःख यातना देत नाहीत. ते कुणाचाही तिरस्कार अथवा भेदभाव करीत नाहीत. शक्य होईल तेवढे ते सकल मानवमात्राचे भले व कल्याणच करतात.

संतांची ही स्वहित व परहित करण्याची रीत आपण शिकूया, त्याच रितीने जीवन जगूया. असे जीवन जगता जगता आता मी माझ्या कुटुंबापुरता, समाजापुरता, देशापुरता संकुचित राहिलेलो नाही तर हा जीव शिवाशी एकरुप होऊ पाहत आहे. माझा अहंकार कमी कमी होत चालला आहे. माझे स्वरुप दर्शन मला होत आहे. परमात्म्यामध्ये मी निरंतर विचरण करत आहे. संतांच्या प्रेरणेने आणि सद्गुरु कृपेने या जीवात इतके बळ आले आहे की पाताळ नव्हे, भूतल नव्हे तर आकाश भेदायचे सामर्थ्य या जीवात आले आहे. अशा शुध्द विचारांची हृदयात वस्ती करुया. या शुध्द विचारांची क्रांती हृदयात घडवूया. बुध्दी व मनावर ब्रह्मज्ञान प्रकाशाचा प्रभाव पाडून, माझा या जगात कोणी शत्रू नाही, कोणाबद्दलही मनात कसली वाईट भावना नाही, मला जे जे काही करायचे आहे, ते भगवंतासाठी करायचे आहे असा दृढ निश्चय करुन भक्तीचा आनंद मिळवण्यासाठी, स्वानंदाचा गाभा प्राप्त करण्यासाठी, सद्गुरुच्या चरणी लीन होऊन अध्यात्माची यशस्वी वाटचाल करुन शाश्वत परमात्म्यामध्ये एकरुप होऊया!

जीवनात दु:ख का आहे?

श्री. शब्बीर इलाई नदाफ
ता. कागल , जि.कोल्हापूर

'जैसी दृष्टी वैसी सृष्टी'. आपण ज्या नजरेने पाहू तसंच आम्हाला जग दिसणार डोळ्यावर जर काळा चष्मा लावला ,तर सारं जगच काळ दिसणार. तांबडा लावला तर तांबडं हा दोष जगाचा नसून तो जगाकडे पाहणाऱ्या दृष्टीचा आहे. आपल्या नजरेतून पहाताना आपण संकुचित भावनेतूनच पहात आहोत. जसं, हा हिंदू आहे, तो मुस्लीम आहे, हा शिख आहे तो ईसाई, हा आफ्रिकन आहे, तो ऑष्ट्रेलियन, हा पाकिस्तानी आहे, याचा पेहराव असा आहे, त्याचं राहणिमान काही वेगळंच आहे, तो काळा आहे, हा गोरा आहे. वास्तविक सर्व लेकरे एकाच प्रभू परमात्म्याची असून आपण समदृष्टीने कधीच पहात नाही . हा भेदाभेद कशासाठी ? म्हणूनच आमच्या जीवनात दु:ख आहे.

पुरातन सर्व साधु संत, फकीर पीर पैगंबर आणि अवतारी महापुरुषांनी या धरतीवर येऊन वारंवार मानव- मात्राला जागे करण्याचा प्रयत्न केला. पण आपण इतक्या गाढ निद्रेमध्ये (अज्ञानाच्या) आहोत की, कधी जागे होणार ? हा खरा प्रश्न आहे.

मनुष्य चंद्र मंगळ इ ग्रह-ताऱ्यांवर जाऊन पोचला अमेरिकन माणसाबरोबर दोन मिनीटामध्ये फोनच्या माध्यामातून आणि कॉंप्युटरच्या साहाय्याने समोरा समोरा पाहून संवाद साधू लागला, आपल्या सुख दु:खाची देवाण घेवाण करु लागला, खूप वेळ वाचविण्यामध्ये व अंतर कमी करण्यामध्ये देखील यशस्वी झाला. पण त्याला माणसां-माणसांतील अंतर कमी करता आलं नाही. शेजाऱ्यांवर प्रेम करता आलं नाही, व्देष,वैर भाव कमी करता आला नाही, म्हणूनच जीवनामध्ये दु:ख आहे.

साधू-संतानी जो मार्ग दाखविला त्या मार्गाने न जाता आपण आपल्या मनमर्जीने भलत्याच मार्गाने म्हणजे अहंकार, व्देष, ईर्ष्या, वैर, घृणा या रस्त्याने जात असून पुढे गेल्यानंतर जुलूम, अत्याचार, हिंसाचार,दहशत आणि लुटमार यांचीच सोबत मिळणार आहे. हा रस्ता कधीच आनंदाच्या ठिकाणी पोहचणारा नाही मग आमच्या जीवनात. सुख कसे येईल ?

'निरंकार जर वसे अंतरी राहील अधरी हास्य मधुर।
निरंकार जर वसे अंतरी सर्वही दु:खे होती दूर।
(अवतारवाणी पद क्र. ३७)

आज खऱ्या अर्थाने जर आम्हाला शाश्वत सुखाची आणि प्राप्ती करावयाचा असेल तर ज्या कारणासाठी आम्हाला या धरतीवर पाठवलं तो उद्देश म्हणजे अंग-संग असणाऱ्या या प्रभू परमात्म्याची प्राप्ती करणे, त्याला जाणणे आणि जाणूनच भक्ती

करण्यासाठी विदामान सद्गुरुंना शरण जावे लागेल, त्यांच्याकडून ब्रह्मज्ञानाची प्राप्तीकरुन घ्यावी लागेल, त्यांनी यथार्थ भक्तीसाठी दिलेले पाच प्रण आणि तीन कर्मावर चालूनच भक्ती करावी लागेल.

संताच्या सहवासामध्ये रहावं लागेल सद्गुरुंच्या मुखातून निघणारी आत्मकल्याणकारी वचनं श्रवण करुन ती आपल्या जीवनात आचरणात आणावी लागतील भक्तीचा रंग चढायला हवा बोलणं, चालणं आणि वागणं संतांसारख बनायला पाहिजे, दास म्हणून घ्यायचं तर दासभावना देखील रुजवायला पाहिजे, भेदभाव नष्ट करता आले पाहिजेत, दुसऱ्याच्या दु:खामध्ये सामील होऊन त्याला सुख देण्याचा भाव जोपासता आला पाहिजे, मनाला विशालतेकडे झुकवावं लागेल, आग लावण्याऐवजी ती विझवण्याकडे आपला कण बनला पाहिजे, विश्वबंधुत्वाचे गुण आत्मसात करुन सदैव परहिताला प्राधान्य द्यायला हवं.

साऱ्या जगाचं भलं व्हावं असं जर मनोमन वाटत असेल तर त्याची सुरवात देखील स्वत:पासून करावी लागेल.

प्रेम, नम्रता, सहनशीलता, सदाचार,सत्यता या संतानी सांगितलेल्या मार्गावरच चालून सद्गुरुच्या येणाऱ्या आदेश आणि उपदेशाचं पालन करुनच आपला इहलोक सुहेला आणि परलोक सुगम होईल.

भक्ती है आदेश मानना।
गुरु की तो बातें माने।
एक जान के एक मान के।
एक का आधार करे हम।
सारी दुनिया संवर जाएगी।
अपना अगर सुधार करें हम।।

❁❁❁

आरोग्यविषयी महत्वाचे
भाग-८

हृदयाचे कार्य व हृदयरोग

हृदय हा मानवी शरीरातील एक महत्त्वाचा अवयव आहे. व्यवहारातही हृदयापासून बोलणे, हृदयाला लागणे, हृदय पिळवटणे इ. वाक्प्रचारावरुन हृदयाचे महत्त्व प्रत्ययास येते. शरीरात जे अवयव आहेत. त्यात अधिकांश अवयव दोन-दोन आहे. एक बंद पडलं तर दुसरं चालू राहतं. उदा. कान, नाक, डोळे, फुप्फसे, किडनी इ. परंतु हृदय मात्र एकच आहे. ते बंद पडलं तर सारंच संपल. म्हणून हृदयाला जपणं फार गरजेचं आहे. हृदयाचा आकार हाताच्या मुठीएवढा असतो. त्याचं वजन २५० ते ३०० ग्रॅम असतं. पिंजरा आणि पाठीचा कणा यांच्या मध्यभागी सुरक्षित ठिकाणी बसवलेले आहे. हृदयाच्या आंतरभागात मारुपेशींनी बनलेली एक भिंत असते. त्यामुळे हृदयाचे दोन भाग किंवा कप्पे पडतात. एकात शुध्द रक्त तर दुसऱ्या कप्प्यात अशुध्द रक्त जमा होत असतं.

हृदयाची धडधड सतत चालू असते. एका मिनिटात साधारणतः ७२ ठोके पडतात. प्रत्येक ठोक्यासरशी हृदय हे शरीरातील दूषित रक्त खेचून घेते व ते शुध्दीकरणासाठी फुप्फसाकडे पाठवते व शुध्द केलेले रक्त केशवाहिन्यांद्वारे शरीरभर पाठवते हे कार्य अखंडपणे चालू असते. हृदयाला चार कप्पे असतात. उजव्या बाजूला अशुध्द रक्त असते व डाव्या बाजूला शुध्द रक्त असते. हृदय सतत आकुंचन प्रसरण पावत असते. उजव्या बाजूला शरीराकडून आलेले रक्त फुप्फुसाकडे पाठवले जाते. फुप्फुसात रक्तातील कार्बन डाय ऑक्साईड वायू बाहेर फेकला जाऊन प्राणवायू शोषला जातो. हे रक्त हृदयाच्या कर्णिकेत आणले जाते आणि तेथून डाव्या जवनिकेतून शरीरभर पोचवले जाते. शरीर आवश्यकतेप्रमाणे ऑक्सिजन व इतर पौष्टिक पदार्थ घेते व अशुध्द रक्त हृदयाकडे पोचवते. रक्त जेव्हा धमन्यांतून वाहते तेव्हा धमन्यांचा त्याच्यावर दाब पडतो त्याला 'रक्तदाब' असे म्हणतात.

हृदयाला चार झडपा (व्हॉल्व) असतात. यामधले डाव्या बाजूचे दोन कप्पे फुप्फुसाकडून ऑक्सिजन घेऊन आलेले रक्त हाताळतात तर उजव्या बाजूचे दोन कप्पे शरीराला ऑक्सिजन पुरवून आलेले व कार्बन डॉय ऑक्साइडयुक्त रक्त सांभाळतात.

या प्रक्रियेत बिघाड झाल्यावर हृदयविकारला सुरुवात होते. हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या तीन प्रमुख रक्तवाहिन्या असतात. या धमन्यांमध्ये कोलेस्टेरॉल, कॅल्शिअम, लघुपेशी, पांढऱ्या रक्तपेशी काही ठिकाणी जमा होऊन रक्तप्रवाहात अडथळा आणतात. यालाच धमनी काठिण्य म्हणतात.

क्रमशः

प्रस्तुत - **दिलराज सिंह** (घाटकोपर)
संपर्क क्र.022-25105512



भाग-५५

॥ म्हणे अवतार... ॥

मूळ अवतारवाणी

दुक्खां मारया बन्दा वेखो कूके ते फ़रयाद करे।
याद न करदा मालक दी जो पल पल ते इमदाद करे।
नाल फ़नाह दे प्रीतां लाईयां बाकी दी पहचान नहीं।
मदमस्ती विच मस्त फिरे पर मौत दा एहनूं ध्यान नहीं।
एदां बन्दा जम्मदा मरदा भोग रिहा ए कई जनम।
कहे अवतार जगत नूं रख लै कर के अपणी मेहर करम।

(पद क्र.48)

मराठी अनुवाद

पहा अति दु:खाने प्राणी अखंड जीवनभर रडतो।
देवाचे हा ध्यान करीना सहाय्य जो याला करतो।
नश्वरासवे प्रेम जोडीले ओळख देवाची न करी।
मदांध झाला विषयामाजी मृत्युचे ना ध्यान करी।
जन्म मृत्यू पाशात अडकूनी भोगीतसे नाना जन्म।
अवतार म्हणे रक्षी या जगता धारण करुनी दयाधर्म। (पद क्र.४८)

युगपुरुष बाबा अवतारसिंहजी यांनी या पदामध्ये म्हटले आहे की, मनुष्य दु:खामुळे आयुष्यभर रडत असतो. ज्या ईश्वराच्या सत्तेने याचे जीवन चालू आहे त्याचे मात्र तो ध्यान करीत नाही. खऱ्या देवाची ओळख करायचे सोडून नश्वर मायेवर त्याचे प्रेम जडलेले असते. विषयांच्या अधीन होऊन तो मदांध होतो आणि एक दिवस मृत्यू झडप घालणार आहे याचे त्याला भानच रहात नाही. शेवटी जन्ममृत्युच्या चक्रात अडकून नाना जन्म भोगत राहतो. म्हणून बाबा अवतारसिंहजी ईश्वराकडे प्रार्थना करीत आहेत की, हे प्रभो तूच दया करुन या जगताचे रक्षण कर.

मनुष्य जन्माला येतानाच रडत येतो आणि त्याचे हे रडगाणे जीवनभर चालू राहते. याचे कारण आईच्या उदरात असताना त्याचे नाते प्रभुशी जोडलेले असते, पण जन्माला आल्याबरोबर ते नाते तुटते आणि तो कावराबावरा होतो. असे म्हणतात की, मातेच्या उदरातून बाहेर काढण्यासाठी त्याने ईश्वराकडे प्रार्थना केलेली असते आणि बाहेर आल्यानंतर ईश्वराचे भजन करण्याच्या बोलीवर त्याचा बाहेर येण्याचा मार्ग ईश्वराने मोकळा केलेला असतो. पण बाहेर आल्यानंतर त्याला मायेचा वारा लागतो आणि तो ईश्वराला विसरुन जातो. दासबोधामध्ये म्हटले आहे की,

गर्भी असता म्हणे सोहं। बाहेर पडता म्हणे कोहं।।

ईश्वराशी असलेले अनुसंधान तुटल्यामुळे आत्मा आपल्या शाश्वत आनंदापासून वंचित होतो आणि परिणामी त्याला दु:ख होते. आपले हरवलेले सुख शोधण्यासाठी तो आयुष्यभर धडपड करतो. पण परमात्म्याशी पुनश्च नाते जोडल्याशिवाय त्याला ते शाश्वत सुख मिळत नाही. ते सुख तो नश्वर वस्तुंमध्ये शोधत असतो. पण नश्वर वस्तु कधीही शाश्वत सुख देऊ शकत नाहीत. म्हणूनच समर्थांना लिहावं लागलं की,

सुखाकारणे झुरला। सेखीं दु:खे कष्टी जाला।
पुढे मागुता धोका आला। यम यातनेचा।।
जन्म अवघा दु:खमुळ। लागती दु:खाचे इंगळ।
म्हणोनियां तत्काळ। स्वहित करावे।। (३-५)

एक ना एक दिवस मृत्यूची टांगती तलवार आपल्यावर आघात करणार आहे हे जाणून जर मनुष्य जीवंत असतानाच ती तलवार बाजुला काढण्याचा प्रयत्न करील तर त्याचा बचाव होऊ शकतो. अन्यथा पुन्हा चौऱ्याशी लक्ष योनीमध्ये जाऊन दरवेळी जन्म आणि मृत्यूला सामोरे जावे लागेल. एकदा हा अनमोल मनुष्य जन्म संपला म्हणजे पुन्हा मनुष्य जन्म मिळेल याचा काहीच भरवसा नाही. याविषयी समर्थांनी दासबोधात म्हटले आहे -

नरदेही ज्ञानेविण। कदा न चुके जन्ममरण।
भोगणे लागती दारुण। नाना नीच योनी।।
रीस कर्मट श्वान सुकर। अश्व वृषभ म्हैसा खर।
काक कुर्कुट जंबुक मार्जार। सरड बेडूक मक्षिका।।
इत्यादिक नीच योनी। ज्ञान नसता भोगणे जनी।
आशा धरी मुर्ख प्राणी। पुढीलिया जन्माची।।

म्हणून मानवाने वेळीच आपले स्वहित साधले पाहिजे. स्वहित म्हणजेच आत्महित. आत्मा-परमात्म्याची ओळख. हे कार्य जर केले नाही तर पुनश्च जन्ममृत्युच्या चक्रात फिरत राहणे क्रमप्राप्त आहे. परंतु खोट्या भ्रमांचा त्याग करुन सत्याची ओळख करुन घेण्याची तयारी असलेली माणसं भेटत नाहीत. मायेचे आकर्षण सोडून परमेश्वराकडे वळण्याची माणसाची तयारी नसते. पण त्यामुळे त्याचा अनमोल जन्म व्यर्थ जात असतो. साधु-संतांच्या हृदयात मानवमात्राच्या प्रती आत्मियता व प्रेम निर्माण झालेले असल्याने त्यांनी स्वत: आत्महित साधल्यानंतर इतरांचेही कल्याण व्हावे म्हणून ते अहेतुकपणे प्रयत्न करीत असतात. जसे संत तुकाराम महाराज म्हणतात की,

संतांचा कळवळा मातेच्या समान। वर्षविती ज्ञान मेघापरी।।

शहनशाहजींनी वरील पदाच्या शेवटच्या ओळीमध्ये याच कळवळ्याच्या भावनेतून ईश्वराकडे प्रार्थना केली आहे की, हे प्रभो या मानवाला सद्बुध्दी दे आणि तूच त्याच्यावर अशी दयादृष्टी कर ज्यायोगे त्याचे रक्षण होईल व त्याचे जीवन सार्थकी लागेल.

- स. वि. लव्हटे,
जुईनगर, नवी मुंबइ

महत्त्वपूर्ण सूचना

सर्व सभासद बंधु-भगिनीस,

श्रीसद्गुरुकृपेने निरंतर प्रकाशित होणाऱ्या मासिक पत्र पत्रिका-संत निरंकारी (मराठी), हसती दुनिया (मराठी) तसेच एक नजर (पाक्षिक) आपणापर्यंत वेळेवर पोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

परंतु अतिशय खेदाची बाब म्हणजे बहुसंख्य वर्गणीदारांची थकीत वर्गणी अजूनही मोठ्या प्रमाणावर बाकी आहे. त्यामुळे थकीत वर्गणीदारांच्या मासिक पत्रिका जानेवारी २०१५ पासून नाईलाजास्तव बंद करण्यात येतील.

थकीत वर्गणीदार सभासदांनी जर आजीवन सदस्यत्वाची एकरकमी वर्गणी रु.१०००/- भरली तर त्यांची मागील थकीत वर्गणी माफ करण्यात येईल.

वार्षिक, त्रैवार्षिक व पंचवार्षिक वर्गणीदारांची थकबाकी सातत्याने वाढत राहिल्यामुळे यापुढे वार्षिक, त्रैवार्षिक व पंचवार्षिक वर्गणी घेणे बंद करण्याचा निर्णय नाईलाजाने घेण्यात येईल. त्यामुळे नवीन सभासद होण्यासाठी वर्गणीदाराने रु.६००/- भरुन १० वर्षासाठी किंवा रु. १०००/- भरुन आजीवन म्हणजे २० वर्षांसाठी सभासद बनणे अनिवार्य राहील.

वास्तविक पाहता सद्गुरु बाबाजींनी आम्हाला ब्रह्मज्ञान देऊन आयुष्यभरासाठी संत बनवलय, एका वर्षासाठी किंवा तीन वर्षांसाठी नाही; मग मासिक पत्रिकेचे आजीवन सभासद बनणे आमचे कर्तव्य नाही काय ?

- संपादक

पटौदी (हरियाणा) येथे आयोजित सत्संग समारोहामध्ये सद्गुरु बाबाजींचे पावन प्रवचन श्रवण करताना भक्तजन

सद्गुरु बाबजींच्या सान्निध्यामध्ये निरंकारी चौक ग्राऊंड नं. ८ दिल्ली येथील आयोजित सत्संग समारोहामध्ये भाव व्यक्त करताना भगिनी मोहिनी आहुजाजी

संत निरंकारी मिशनच्या तत्वानुसार ऑकलँड (न्युझीलँड) येथे रक्तदान करत असलेले श्रध्दाळू

Printed Matter
RNI No.59874/1993
Postal Regd No.MCE/91/2012-2014
Publishing date 7th of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 8th of every month

मेरठ (उत्तर प्रदेश) मध्ये आयोजित सत्संग समारोहामध्ये श्रध्दाळू भक्तजनांचे अभिनंदन स्वीकारताना सद्गुरु बाबाजी

उत्तराखंडची राजधानी डेहराडून येथे आयोजित सत्संग समारोहामध्ये सद्गुरु बाबाजी व पूज्यमाताजी यांच्याकडून आशीर्वाद घेताना उत्तराखंडचे माननीय मुख्यमंत्री श्री. हरीश रावतजी

सद्गुरु बाबाजींच्या सान्निध्यामध्ये जागतिक पर्यावरण दिवसाच्या निमित्ताने मसूरी (उत्तराखंड) मध्ये संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनद्वारा आयोजित समारोहाचे दृश्य